नेमणे आहे
नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.
१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

# दैनिक जनता आवाज

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १३६ शुक्रवार, दि. ११ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## ... आता 'कर्नाक' नव्हे, 'सिंदूर पूल'

### मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते पुलाचे लोकार्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई : दक्षिण मुंबईतील नूतनीकरण केलेल्या कर्नाक उड्डाणपूलाला सिंदूर उड्डाणपूल म्हणून ओळखले जाणार आहे. मुंबई महानगरपालिकेने या पुलाच्या नावात बदल केला आहे. कर्नाक उड्डाणपुलाला दिलेले सिंदूर हे नाव भारताने पाकिस्तानविरुद्ध केलेल्या लष्करी कारवाई ऑपरेशन सिंदूर पासून प्रेरित असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुलाचे उद्घाटन आज झाले.**



**काळ्या इतिहासाचा उल्लेख करत प्रबोधनकार ठाकरेंच्या पुस्तकाचा दिला संदर्भ**

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी काळ्या इतिहासाच्या पानांचा उल्लेख करत प्रबोधनकार ठाकरे यांच्या पुस्तकाचा देखील संदर्भ दिला. दक्षिण मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम भागांना जोडणारा हा पूल आहे. पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा हा पूल पूर्वी कर्नाक पूल म्हणून ओळखला जात होता. १८३९ ते १८४१ पर्यंत मुंबई प्रांताचे तत्कालीन राज्यपाल जेम्स रिव्हेट कर्नाक यांच्या नावावर या पुलाचे नाव ठेवण्यात आले होते. आता भारतीय सैन्याच्या ऑपरेशन सिंदूर नंतर या पुलाला सिंदूर पूल असे नाव देण्यात आले आहे.

हा पूल २०२२ मध्ये पाडण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्टेशन, मस्जिद बंदर आणि मोहम्मद अली रोडवरील वाहतुकीसाठी हा पूल म हत्त्वाचा आहे. जवळजवळ १५० वर्षे जुना ब्रिटिशकालीन कर्नाक पूल वाहतुकीसाठी असुरक्षित घोषित करण्यात आला होता. मध्य रेल्वेच्या अहवालानंतर हा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. ऑगस्ट २०२२ मध्ये तो पाडण्यात आला. या पुलाची लांबी ३२८ मीटर होती. यानंतर, नवीन पुलाचा आराखडा तयार करण्यात आला.

मध्य रेल्वेने या नवीन आराखड्याला मान्यता दिली. त्यानंतर, पुलाचे बांधकाम सुरू झाले. पुलाची एकूण लांबी ३२८ मीटर आहे, त्यापैकी ७० मीटर रेल्वे हद्दीत आहे. पुलावर दोन स्टील गर्डर आहेत, पान ४

#### मुख्यमंत्र्यांकडून मुंबई मनपाचे अभिनंदन

मस्जिद बंदर रेल्वे स्थानकाजवळ सिंदूर उड्डाणपूल आहे. तो पी. डीमेलो रोडला जोडतो. आता या पुलावर दोन्ही बाजूंनी वाहतूक शक्य होईल. अतिरिक्त महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या नेतृत्वाखाली अभियंत्यांनी हा पूल बांधला आहे. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी या पुलाच्या बांधकामांबद्दल मनपाचे अभिनंदन केले. अभियंत्यांनी सिंदूर उड्डाणपुलाचे बांधकाम वेळेवर पूर्ण केले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

## नगर शहरातच वैद्यकीय महाविद्यालय होणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आ. संग्राम जगताप यांना आश्वासन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्य सरकारने अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले आहे. हे वैद्यकीय महाविद्यालय अहिल्यानगर शहरातच व्हावे या मागणीसाठी गुरवारी शहराचे आमदार संग्राम जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची विधीभवनात भेट घेऊन निवेदन दिले.

यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पान ४

#### वैद्यकीय महाविद्यालयामुळे विद्यार्थ्यांची सोय

वैद्यकीय महाविद्यालयासाठी अहिल्यानगर शहरातील मध्यवर्ती भाग असलेल्या नालेगाव परिसरातील कृषी विभागाची २५ एकर जमीन उपलब्ध आहे. सध्या ही जागा वापरात नसून त्या जागी जर सदर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु केल्यास सर्व नागरिकांची चांगली सोय होईल. अहिल्यानगर जिल्ह्यासह सोलापूर, पुणे व मनमाड जिल्हांना जोडणारा हा मध्यवर्ती भाग आहे. त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नगर शहरातच होणार असल्याचे आ. संग्राम जगताप यांनी सांगितले आहे.

## बच्चू कडूंच्या यात्रेला मनसेचा पाठिंबा?

**जनता आवाज वृत्तसेवा**



**यवतमाळ :** मराठी भाषेच्या लढ्याला पाठिंबा दिल्यानंतर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या ७/१२ कोरा कोरा कोरा यात्रेला सम र्थन जाहीर केले आहे. मनसेचे नेते बाळा नांदगावकर , १० जुलै रोजी यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा तालुक्यातील लालखिंड येथे या पदयात्रेत सहभागी झाले आहेत.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आयोजित या यात्रेला पाठिंबा देण्यासाठी नांदगावकर प्रत्यक्ष उपस्थित राहणार असल्याची माहिती पान ४

## परमबीर सिंग यांना क्लीनचीट

**जनता आवाज वृत्तसेवा**



**ठाणे :** माजी मुंबई पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांना केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने ठाण्यातील कोपरी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या खंडणी आणि धमकी प्रकरणात क्लीन चीट दिली आहे.

सिंग यांनी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप करून खळबळ माजवली होती. या प्रकरणात सीबीआयने तपास बंद करण्याचा पान ४

## संमिश्र

### बिहारमध्ये मतदार यादी सुधारणा सुरूच राहणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पटना :** बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदार यादीच्या पुनरीक्षणाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नकार दिला. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला आधार, मतदार ओळखपत्र, रेशनकार्ड हे ओळखपत्र म्हणून विचारात घेण्यास सांगितले. आता पुढील सुनावणी २८ जुलै रोजी होणार आहे. न्यायालयाने विशेष सघन पुनरीक्षण म्हणजेच मतदार यादी पुनरीक्षणावर सुमारे ३ तास सुनावणी केली.

### नागपूरमधील उद्घाटनासाठी सज्ज असलेला उड्डाणपूल खचला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नागपूर :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा जिल्हा म्हणजे नागपूर. येथील रस्ते, उड्डाणपुले व इतर विकासकामे ही चांगल्या दर्जाची असतील असे अनेकांना वाटत असेल. परंतु, तसे नसल्याचे समोर आले आहे. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मतदारसंघातील उद्घाटनासाठी सज्ज असलेल्या उड्डाणपुलाचा रस्ता खचला असल्याचे समोर आले आहे.

### माजी मंत्री भुमरेंना विमानापेक्षा जास्त वेगाने दारू परवाने

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** माजी मंत्री आणि विद्यमान खासदार संदीपान भुमरेंना विमानापेक्षा जास्त वेगाने दारूचे परवाने मिळाले. सकाळी अर्ज केला, दुपारी बैठक झाली आणि संध्याकाळी पुढली सारी प्रोसेस अतिशय सुपर-डुपर फास्ट पार पडली, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी आज माध्यमांशी बोलताना केला.

### पंतप्रधान मोदींनी निवृत्ती घ्यावी : संजय राऊत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** नरेंद्र मोदी संघ मुख्यालयात गेले होते, त्याचवेळी मी एक रोखठोक सदर लिहिले होते. त्याचवेळी संघ मुख्यालयात काय चर्चा झाली याचा सारांश मी त्यात लिहिला होता. नरेंद्र मोदी किंवा संघाने जो नियम केला होता की, ७५ वर्षे झाल्यानंतर सत्तेच्या पदावरून निवृत्ती घ्यावी. नरेंद्र मोदी यांनी लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, यशवंत सिन्हा अशा अनेक नेत्यांना आपल्या स्वार्थासाठी जबरदस्तीने निवृत्ती घ्यायला लावली.

## कुंभमेळापूर्वी नगर-सावळीविहीर रस्ता पूर्ण होणार

### जलसंपदा मंत्री विखे पाटील आणि मंत्री भोसले यांच्या बैठकीत निर्णय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शेवगाव बाह्यवळण रस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या नियंत्रणाखाली करण्याचे, तसेच कुंभम ेळाच्या पुर्वी अहिल्यानगर ते सावळीविहीर रस्ताच्या काम पूर्ण करण्याचा निर्णय जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला.



कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर साविळीविहीर ते अहिल्यानगर मार्गाचे काम निर्धारीत वेळेत पुर्ण करा. मार्गाचे महत्व लक्षात घेवून कामामध्ये कोणतीही तडजोड न करता दर्जेदार कामास प्राधान्य देण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सार्वजनीक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव बाह्यवळण रस्ता तसेच सावळीविहीर ते अहिल्यानगर रस्त्याच्या कामाचा आढावा घेण्यासाठी विधान भवनात जलसंपदा मंत्री विखे पान ४

#### डॉ. सुजय विखेंसह आ. राजळेंचाही पाठपुरावा

डॉ. सुजय विखे पाटील आणि आ. मोनिका राजळे यांच्या पाठपुराव्यामुळे झालेल्या बैठकामध्ये या मार्गाच्या कामाचा आरखडा निश्चित करण्यात आला होता. शहरातून म राठवाड्याकडे जाणारी वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी २२.६०२ कि.मी.लांबीचा या रस्ते प्रकल्पासाठी ५६.१९१ हेक्टर इतकी जम ीन संपादीत करावी लागणार असून यासाठी ८० कोटी रूपयांच्या निधीचा प्रस्ताव अर्थसंकल्पातील तरतूदीसाठी सादर करण्यात आला आल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

## दफनविधीची तयारी सुरु, अन् बाळाचा आला आवाज

**बीडच्या अंबाजोगाई तालुक्यातील चमत्कार; डॉक्टरांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह?**

**जनता आवाज वृत्तसेवा**





**बीड :** बीड जिल्ह्यात चकित करणारी एक अजब घटना घडली आहे. येथे मृत्यू झालेलं नवजात बाळ अचानक जिवंत झालं आहे. विशेष म्हणजे कित्येक तास शवपेटीत ठेवूनही दफनविधीच्या वेळी लोकांना बाळाचं रडणं ऐकायला आलं आहे.

बीड जिल्ह्यात घडलेल्या या प्रकाराची सध्या सगळीकडे चर्चा होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार बीडमधील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रुग्णालयात डॉक्टरांनी एका बाळाला मृत म्हणून घोषित केले होते. आमच्या बाळाचा मृत्यू पान ४

## ... आता गणेशोत्सव 'महाराष्ट्राचा राज्योत्सव'

**मंत्री आशिष शेलार यांची घोषणा**





**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** महाराष्ट्रात भाजप नेते आशिष शेलार यांनी गणेशोत्सव हा आता राज्योत्सव म्हणून घोषित केल्याची घोषणा केली आहे. हे मुंबईच्या पावसाळी अधिवेशनात जाहीर झाले. या निर्णयाने गणेश भक्तांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेला गणेशोत्सवाला अवघे काही महिने शिल्लक राहिले आहेत. आता महाराष्ट्रातील गणेशभक्तांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि पान ४

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्यायालयासमोर गणेशोत्सवाबाबत अत्यंत स्पष्ट भूमिका मांडली आहे. पीओपी मूर्तींवरील निर्बंध हटवण्यात आले असून, विसर्जन परंपरागत पद्धतीनेच व्हावे, असे धोरण सरकार न्यायालयासमोर मांडत आहे. राज्य सरकारचे धोरण गणेशोत्सवासाठी कोणत्याही प्रकारे आडकाठीचे असणार नाही.
>
> **– आशिष शेलार, मंत्री**

## गटार सफाईदरम्यान एकाचा मृत्यू

**दोघांची प्रकृती चिंताजनक; संगमनेर नगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** शहरातील जोर्वे नाका परिसरात असलेल्या नॅशनल इंग्लिश मिडियम स्कूलजवळ मुख्य गटार सफाईदरम्यान विषारी गॅसच्या संपर्कात आल्यामुळे एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून त्याला वाचवण्यासाठी गेलेले दोन गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना काल, दि. १० जुलै रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली.

नगरपालिकेने एसटीपी प्लांटच्या पार्श्वभूमीवर अलीकडेच या परिसरात नव्या भूमीगत गटारे बांधली असून, सदर गटार मधोमध रस्त्यावर असल्याने पान ४



## गेम हरला अन् स्वतःही संपला

**जनता आवाज वृत्तसेवा**



**नाशिक :** ऑनलाईन गेमच्या आडून खेळल्या जाणाऱ्या जुगाराने एका सोळा वर्षांच्या मुलाचा बळी गेला आहे. लहान मुलांना मोबाईलने कसे नादाला लावले असल्याचा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने सर्वत्र चिंता व्यक्त होत आहे. नाशिकच्या सम्राट भालेराव या १६ वर्षांच्या मुलाने मोबाईलवर गेम पान ४

## जितके दिवस पाणी तेवढीच पट्टी घ्या

### नागरिकांची मागणी : नगरमध्ये कुपनलिका घेण्याची संख्या वाढली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महापालिका प्रशासनाकडून वर्षभराची पाणी पट्टी आकारली जात आहे. मात्र पाणी वर्षातून १५० ते १७५ दिवस येत आहे. इतर दिवशी शहरातील सर्वच भागात कोरडा दिवस पाळला जात आहे.




त्यामुळे या कोरड्या दिवसाची पाणी पट्टी सर्वनगरकारांना आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी माफ करावी, अशी मागणी नगरकरांमधून होत आहे. याकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून मनपा प्रशासनाला बारा महिने पुरवठा करायला भाग पाडावे, अन्यथ नागरिकांची पट्टी माफ करावी, अशी अपेक्षा नगरकरांमधून व्यक्त केली जात आहे.

महापालिकेतील पदाधिकारी राज संपुष्टात येऊन गेल्या तीन वर्षांपासून महापालिकेत प्रशासक राज आलेले आहे. या प्रशासक राज काळात अनेक विकासात्मक कामे होतील, अशी सर्वांना आशा होती. मात्र या प्रशासक राज काळात विकास कामे काही झालेली नाही. मात्र अधिकारी स्वतःची प्रसिध्दी करून घेण्यात व्यस्त असल्याचे दिसून आले. नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांनी वेळ देण्याऐवजी ते इतर कामात आपला वेळ घालवत असल्याच्या तक्रारी नागरिकांमधून होत आहे.

सध्या पाणी पट्टीसह इतर थकबाकी वसुली मोहीम सुरु केलेली आहे. तसेच आगाऊ रक्कम भरणाऱ्यांना मनपा प्रशासन सूट देत आहे. यामुळे पट्टी वसूल होत आहे. पट्टी वसुलीसाठी नागरिकांना जशा स्किम दिल्या जात आहे. तशाच नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी मनपा प्रशासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्यासाठी नागरिकांच्या पाणी प्रश्नाच्या समस्या ऐकून घेणे प्रशासनाने गरजेचे आहे.

पाणी वेळेत येत नसल्यामुळे आता नगरकर पुन्हा कुपनलिका घेण्याकडे वळलेले आहेत. महापालिकेच्या पाण्यापेक्षा आपले हक्काचे पाणी उपलब्ध करून घेण्याचा नागरिकांचा प्रयत्न सुरु असल्याचे सध्या दिसून येत आहे. शहरात दररोज कुपनलिका घेतल्या जात आहे.

#### पाणीपुरवठ्याचा आढावा कधी घेतला

आयुक्त यशवंत डांगे यांनी शहरात कोणत्या भागात कधी पाणी पुरवठा होतो, याचा कधी आढावा घेतला हे त्यांनी जाहीर करावे, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. त्यांनी जर वेळच्या वेळी जर पाणीपुरवठ्याचा आढावा घेतला असता तर नागरिकांना पाणी पाणी करण्याची वेळ आली नसती. आयुक्तांनी पाणीपुरवठ्याचा आढावा घेऊन कामचुकारांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

#### नागरिक पाळतात कोरडे दिवस

मनपा प्रशासकांकडून शहरात कोरडा दिवस अभियान राबविले जात आहे. प्रत्येक प्रभागातील पाणी साठ्यांची पाहणी स्वतः आयुक्त करीत असल्याची प्रसिध्दी ते स्वतः मिळवित आहेत. ही प्रसिध्दी मिळविताना आयुक्तांनी पाणी किती दिवसाने येते, हे प्रत्येक नागरिकाला विचारल्यास सत्य बाहेर येऊ शकतो. त्यासाठी त्यांनी चौकशी केल्यास नागरिक आठवड्यातून तीन ते चार दिवस कोरडा दिवस पाळतात हे स्पष्ट होईल.

#### धरणात पाणी नगरमध्ये टंचाई

मुळा धरणात पाण्याची पातळी सध्या वाढत चालली आहे. मात्र मनपाच्या चुकीच्या धोरणाने नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. धरणात पाणी असतानाही नगरमध्ये पाणी टंचाई जाणवत असल्याने नगरकरांमधून प्रशासकांच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली जात आहे.

**पावसाचा कहर**



# साईनामाच्या गजराने शिर्डी नगरी दुमदुमली

## गुरुपौर्णिमेनिमित्त लाखो भाविकांचे साई समाधीचे दर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने आयोजित केलेल्या श्री गुरुपौर्णिमा उत्सवाच्या मुख्य दिवशी राज्यातून व देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या लाखो भाविकांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. राज्याच्या विविध भागातून आलेल्या पालखीतील साईभक्तांच्या साईनामाच्या गजराने शिर्डी दुमदुमून गेली.

काल उत्सवाच्या मुख्य दिवशी श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाच्या अखंड पारायणाची समाप्ती झाली. अखंड पारायण समाप्ती मिरवणूकीत संस्थानचे तदर्थ समितीच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजु शेंडे (सोनटक्के) यांनी पोथी, मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी वीणा तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे व मेकॅनिकल विभाग प्रमुख अतुल वाघ यांनी प्रतिमा घेवून सहभाग घेतला. यावेळी प्रशासकिय अधिकारी संदीपकुमार भोसले, मंदिर विभाग प्रमुख विष्णु थोरात, प्र.जनसंपर्क अधिकारी दिपक लोखंडे, मंदिर पुजारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळी श्रींचे मंगलस्नान झाले. सकाळी श्री गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमित्त संस्थानचे तदर्थ समितीच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजु शेंडे (सोनटक्के) व त्यांचे पती प्रेमानंद सोनटक्के यांनी श्रींची पाद्यपूजा केली. दुपारी श्रींची माध्यान्ह आरती झाली. रात्री श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक काढण्यात आली.

उत्सवाच्या सांगता दिनी आज शुक्रवार सकाळी १० वाजता प्राची व्यास, बोरीवली यांचे काल्याचे कीर्तन व दहीहंडीचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी श्रींची माध्यान्ह आरती होईल. सायंकाळी ७ वाजता श्रींची धुपारती होईल.

### साईंच्या चरणी भरभरून दान

उत्सवाचे मुख्य दिवशी चेन्नई, तामीळनाडू येथील श्रीमती ललिता मुरलीधरन व कॅ. मुरलीधरन या साईभक्ताने साईचरणी ३ लाख ०५ हजार ५३२ रुपये किंमतीचा ५४ ग्रॅम वजनाचा आकर्षक नक्षीकाम केलेला सुवर्ण हिरे जडीत ब्रोच श्री साईचरणी अर्पण केला. तर एका साईभक्ताने सुमारे २ किलो वजनाचा चांदीचा आकर्षक हार आणि सुमारे ५९ लाख रूपये किंमतीचा ५६६ ग्रॅम वजनाचा आकर्षक नक्षीकाम असलेला सोन्याचा मुकुट श्री साईबाबांच्या चरणी अर्पण अर्पण केला.



# नेवासाफाटा येथे उपजिल्हा रुग्णालय सुरु करा

## आमदार लंघे यांची विधानसभेत ठाम मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**




**नेवासा :** संभाजीनगर-अहिल्यानगर महामार्गावरील अपघात प्रवण आणि वाहतुकीचा केंद्रबिंदू असलेल्या नेवासाफाटा येथे १०० खाटांचे सर्व सुविधायुक्त उपजिल्हा रुग्णालय सुरू करावे, अशी ठोस मागणी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी पावसाळी अधिवेशनात विधानसभेत केली.

नेवासा फाट्यावरील विद्यमान ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय अपुरे असून, अपघातग्रस्तांना वेळेत वैद्यकीय मदत मिळत नाही. या भागातून शेंद्रा, वाळूंज, बीड, नाशिक, पंढरपूर अशा औद्योगिक शहरांकडे मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्याने अपघात वाढले आहेत.

१०८ रुग्णवाहिकेत डॉक्टर नसणे आणि तत्काळ सुविधा न मिळणे ही मोठी समस्या असल्याचे आमदार लंघे यांनी स्पष्ट केले. रुग्णांसाठी वेळेवर प्राथमिक उपचार मिळावेत म्हणून रुग्णालय उभारणी अत्यावश्यक आहे, असे त्यांनी अधिवेशनात स्पष्टपणे मांडले.

# गुरुपौर्णिमा उत्सवाला कोल्हे यांची उपस्थिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** राष्ट्रसंत सद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज आश्रम, बेट कोपरगाव येथे गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या भक्तिभावात पार पडला. या पावन सोहळ्यात संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनराव कोल्हे यांनी उपस्थित राहून वंदनीय महंतांचे दर्शन घेतले व त्यांच्याकडून आशीर्वाद प्राप्त केला.

गुरुपौर्णिमानिमित्त आयोजित कार्यक्रमात मठाधिपती गुरुवर्य स्वामी रमेशगिरी महाराज, परमश्रद्धेय स्वामी माधवगिरी महाराज, १००८ महामंडलेश्वर स्वामी शिवगिरीजी महाराज, स्वामी ज्ञानानंदगिरी महाराज, साध्वी शारदानंद माताजी, स्वामी भोलेगिरी महाराज, स्वामी गणेशगिरी महाराज, स्वामी दिनेशगिरी महाराज, स्वामी राघवेश्वरानंदगिरी महाराज, स्वामी विकासगिरी महाराज आदी वंदनीय संत-महंत, तसेच शिवभक्त भाऊ पाटील यांची उत्सवात पावन उपस्थिती लाभली. कोल्हे यांनी या सर्व संतांचे पूजन करून, त्यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त केली. या निमित्ताने त्यांनी गुरुपौर्णिमेचे अध्यात्मिक महत्त्व विशद करत सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला जनार्दन स्वामी महाराज ट्रस्टचे अध्यक्ष बाळकृष्ण होळकर, ट्रस्टचे विश्वस्त उपस्थित होते.



### सुमित कोल्हे यांनी घेतले दर्शन


कोपरगाव शहरातून गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त पूर्वसंध्येला मठाधिपती प. पूज्य महंत रमेशगिरीजी महाराज यांची स्वामी जनार्दन प्रतिष्ठान आणि समस्त भक्तगणाच्या वतीने पुष्पवृष्टी करून मिरवणूक काढण्यात आली होती. यासाठी संजीवनी शिक्षण संस्थेचे ट्रस्टी सुमित कोल्हे यांनी उपस्थित राहून रमेशगिरीजी महाराज यांचे पूजन केले व आशीर्वाद घेतले.

# व्यावसायिक तरूणीची ३० लाखांची फसवणूक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** विमान तिकीट बुकिंग एजन्सीच्या नावाखाली दिल्या जाणाऱ्या कमिशनचे आमिष दाखवून नगर मधील एका व्यावसायिक तरूणीची ३० लाख रूपयांची फसवणूक करण्यात आल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात मुंबईच्या दोन जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आचल पवनकुमार अग्रवाल (वय. २४, रा. तांबटकर मळा, गुलमोहोर रोड, सावेडी) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. फिर्यादीत म्हटले आहे की, फिर्यादी यांचे वडील नगर एमआयडीसी येथे श्रीराम इंडस्ट्रीज नावाची कंपनी चालवतात. ऑगस्ट २०२४ मध्ये कुटुंबीयांसाठी विमान तिकीटांची व्यवस्था करताना त्यांची ओळख अनुज अनिल मित्तल यांच्याशी झाली. त्याचवेळी मित्तल यांनी त्यांना रिजॉईस इव्हेंट ऑर्गनायजेशन या कंपनीबाबत माहिती दिली, जी फ्लाईट व हॉटेल बुकिंगसाठी एजंट शोधत होती. यानुसार मित्तलने २७ ऑगस्ट २०२४ रोजी नगरमधील अक्की बर्गर, प्रोफेसर चौक येथे अग्रवाल यांची भेट राहुल दर्शन जगताप आणि त्याची पत्नी एंजल राहुल जगताप (दोघे रा. सानपाडा, नवी मुंबई) यांच्याशी घालून दिली. त्यांनी अग्रवाल यांना कंपनीची एजन्सी देण्याचा प्रस्ताव ठेवला. तुम्ही गुंतवणूक केल्यास १५ टक्के कमिशन मिळेल, असे आमिष त्यांना दाखवले. मात्र त्यासाठी सुरुवातीस ३० लाखांची गुंतवणूक करावी लागेल असे सांगण्यात आले.



अग्रवाल यांनी येस बँक, सावेडी शाखेमधून ३० लाख रुपयाची रक्कम सुशिला दर्शन जगताप यांच्या खात्यात ट्रान्सफर केली. मात्र त्यानंतर ना कोणताही करारनामा झाला, ना एजन्सी मिळाली. अग्रवाल यांनी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण जगताप दांपत्य टाळाटाळ करु लागले आणि शेवटी फोन बंद ठेवू लागले. त्यामुळे फसवणूक झाल्याचे अग्रवाल यांच्या लक्षात आले. याप्रकरणी आंचल अग्रवाल यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात राहुल जगताप व एंजल जगताप यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात केला. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक गोंटला हे करीत आहेत.

# घरकुलांच्या लाभार्थ्यांना मिळणार उर्वरीत रक्कम

## आ. विठ्ठल लंघे यांनी वेधले होते शासनाचे लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा येथील समर्पण फाउंडेशनचा निर्वाणीचा आंदोलन इशारा व आमदार विठ्ठलराव लंघेंनी घरकुल लाभार्थींना प्रश्नांत गांभीर्याने लक्ष घातल्याने घरकुलाच्या लाभधारकांना तीन टप्प्यांतील उर्वरित रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून येत्या पंधरा दिवसात हा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे समर्पण फाउंडेशनचे सर्वेसर्वा डॉ. करणसिंह घुले यांनी सांगितले.

तालुक्याचे लोकप्रतिनिधी आमदार विठ्ठलराव लंघे यांनी देखील जातीने या प्रश्नात लक्ष घातले. संबंधित विभागांना मंत्र्यांनी रक्कम अदा करण्याचे आदेश दिल्यामुळे येत्या पंधरा दिवसात सर्व तीनही टप्प्यातील घरकुलाच्या लाभधारकांना त्यांची उर्वरित रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

घुले म्हणाले, नेवाशाच्या नगरपंचायत अखत्यारीत सन २०१८ पासून सुरु असलेली घरकुल योजना फेज एक व दोन मधील घरकुलांना अद्याप शेवटचे दोन हप्ते मिळालेलेच नाही. काही लाभार्थ्यांची तीस हजार काही लाभार्थ्यांचे ६० हजार तर काही लाभार्थ्यांचे ९० हजार रुपये सुमारे सात वर्षांपासून प्रलंबित आहेत.



या योजनेच्या आडून गरीब जनता पिळवटून निघते आहे हे लक्षात आल्यानंतर समर्पण फाउंडेशन ने लोकसभा निवडणुकीच्या आधी पासुन घरकुलाच्या बाबतीत पाठपुरावा सुरु केला. जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नगरपंचायत च्या मुख्याधिकाऱ्यांच्या दालनामध्ये घरकुल लाभ धारकांची बैठक घेऊन निर्वाणीचा इशारा देण्यात आला. १० जुलै पर्यंत जर अचूक पद्धतीने कागदपत्र व मागणीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयात सादर केला गेला नाही तर ११ जुलैपासुन समर्पणच्या स्टाईलने आंदोलन केले जाईल, असा इशारा देण्यात आला.

# गुरुपौर्णिमेनिमित्त मोहटादेवीच्या दर्शनासाठी गर्दी

## रांजणी ते मोहटादेवी पायी दिंडीचे जंगी स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** मोहटागड (ता. पाथर्डी): गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिवशी श्री क्षेत्र मोहटादेवी गडावर हजारो भाविकांनी देवीचे दर्शन घेतले. पहाटेपासूनच गडावर भाविकांची दर्शनासाठी रीघ लागली होती. धार्मिक उत्साह, अध्यात्मिक वातावरण आणि भक्तिभाव याने संपूर्ण परिसर भारलेला दिसत होता. विशेष म्हणजे अहमदनगर येथून महिलांची पारंपरिक पायी दिंडी पोहोचल्यावर त्यांचे देवस्थान समितीच्या वतीने मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

या निमित्ताने मोहटादेवी देवस्थानतर्फे अनेक धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. श्री क्षेत्र भगवानगड येथील कीर्तनकार गणेश महाराज बडे यांच्या प्रभावी कीर्तनाने वातावरण भारावून गेले. देवस्थान समितीतर्फे सर्व भाविकांसाठी दोन वेळचे महाप्रसाद वाटप, पिण्याच्या पाण्याची सोय, आरोग्य तपासणी व्यवस्था, दर्शन रांगा, पार्किंग व्यवस्था, तसेच रात्री मुक्कामासाठी निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, आणि जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले.

### महिलांची दिंडी ठरली आकर्षक

विशेष आकर्षण ठरली ती रांजणी (ता. नगर) येथून निघालेली महिलांची पायी दिंडी. स्व. प्रभाकर भानुदास गोरे यांच्या प्रेरणेतून सुरू झालेली ही परंपरा यंदा सलग ३१ वर्षात पदार्पण करते आहे. प्रयागा प्रभाकर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे एक हजार महिला पायी चालत मोहटागडावर पोहोचल्या. त्यांच्या आगमनाने गडावर धार्मिक ऊर्जा संचारली.

# दीड कोटींच्या विकास कामांचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** वर्षानुवर्षे रस्त्यांची दुरावस्था आणि मूलभूत सुविधांची कमतरता असल्यामुळे कोपरगाव शहरातील प्रभाग क्र. ४ व ७ मधील नागरिक त्रस्त झाले होते. नागरीकांना होणाऱ्या अडचणींची दखल घेवून आ. आशुतोष काळे यांनी दिलेल्या १.३३ कोटी निधीतून करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन नुकतेच आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात आले.



### शहरातील या रस्त्यांचे होणार काम

प्रभाग क्र. ४ मध्ये महिला महाविद्यालय ते श्री बिरोबा मंदिर, औताडे घर ते नवीन शर्मा घर तसेच नविन शर्मा घर ते गारदा नाला या ठिकाणी भूमिगत गटार करणे. सोळसे घर ते शंकर वाघ घर, मैंद घर ते नवनाथ हुसळे घर पेव्हिंग ब्लॉक बसवणे, कालिकानगर फरताळे दुकान ते सुकदेव कोळगे, वडांगळे घर ते शेखर रहाणे व सातपुते घर ते घेमूड घर ते काळे घर रस्ता करणे आदी कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

### शहरातील नागरिकांना दिले आ. काळेंचा धन्यवाद

आ. काळे म्हणाले की, शहराचा सर्वांगीण विकास हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक नागरिकास मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पाणी आणि वीज यांसारख्या बाबतीत कोणताही भाग दुर्लक्षित राहू नये, यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. विकासाच्या प्रत्येक टप्प्यात जनतेचा सहभाग अत्यंत आवश्यक असून जेवढा शाश्वत व नियोजनबद्ध विकास होईल तेवढेच भविष्यातील पिढ्यांचे आयुष्य सुखकर आणि सुरक्षित होणार आहे.

# गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्ताने देवगडला ३ लाख भाविकांची मांदियाळी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड येथे श्री गुरुदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत भास्करगिरी महाराज यांच्या आयोजित कीर्तन सोहळयाला उच्चांकी गर्दी दिसून आली. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने सुमारे तीन लाख भाविकांनी भगवान दत्तात्रयांचे दर्शन घेतले. ''दिगंबरा दिगंबरा.. श्रीपाद वल्लभ दिगंबरा''...व ''श्री समर्थ सद्‌गुरू किसनगिरी बाबा की जय'' च्या नामघोषाने देवगडनगरी दुमदुमली होती.गुरूंचा महिमा व लीला अगाध असा असून संत हे जगाचे कृपाळू मायबाप आहे, गुरूंबद्दल असलेल्या भक्तीभावाला व श्रद्धेला शेवटच्या श्वासापर्यंत जपा असे आवाहन भास्करगिरी बाबांनी यावेळी झालेल्या कीर्तन सोहळयात बोलतांना केले.



गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गुरूवारी(दि.१०)भास्करगिरी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते पहाटेच्या सुमारास भगवान दत्तात्रय,श्री समर्थ सद्‌गुरू किसनगिरी बाबांच्या समाधीस अभिषेक घालण्यात आला. देवगड येथील ज्ञानसागर सभामंडपामध्ये भास्करगिरी बाबा यांचे गुरू शिष्य परंपरा व गुरू महिमा यावर हरिकीर्तन झाले. श्री समर्थ सद्‌गुरू किसनगिरीजी बाबांनी गुरुदेव दत्त पिठाची निर्मिती करतांना अनवाणी पायाने फिरले,त्यांनी यासाठी फार कष्ट सोसले त्यांनी देवगड येथे गुरुदेव दत्त पीठ हे आपल्या सुखासाठी व मानव जातीच्या उद्धारासाठी निर्माण केले आहे,त्यांनी दिलेल्या विचार प्रणालीचे पालन करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य असून गुरूंबद्दल असलेला भक्ती भाव व श्रद्धेला शेवटच्या श्वासापर्यंत जपा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी झालेल्या कीर्तन सोहळयाच्या प्रसंगी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांनी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने भास्करगिरी बाबांसह उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांचे संतपूजन केले.यावेळी झालेल्या किर्तनानंतर महाआरती करण्यात आली.महाआरतीच्या प्रसंगी देवगडचे दत्त मंदिर प्रांगण हजारो भाविकांच्या गर्दीने फुलून गेले होते.मंदिर प्रांगणात विविध दुकाने मोठ्या प्रमाणात थाटल्याने यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

# तीन महिन्यात ३७५ जणांना दुषित पाण्याची बाधा

## अकोले तालुक्यातील राजूर येथील चित्र; जि. प. ॲक्शन मोडवर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** एप्रिल महिन्यापासून ते आजअखेर पर्यंत अकोले तालुक्यातील राजूर गावात ३७५ जणांना दूषित पाण्यामुळे त्रास झालेला आहे. गेल्या तीन महिन्यांपासून हा प्रकार सुरू आहे. या दुषित पाण्याने काही महिन्यापूर्वी दोन जणांचा बळी घेतला होता. त्यानंतरही ग्रामस्थांना त्रास सुरू असल्याने जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने कंबर कसून सुमारे २५ पथकांची नियुक्ती केली. या पथकाने घरोघर जावून पाण्याचे नमुने घेत तपासणी केली. अथक प्रयत्नानंतर आता ही साथ अटोक्यात आली आहे.

अकोले तालुक्यातील राजूर या गावाला पाणीपुरवठा निळवंडे धरणाच्या बॅक वॉटरमधून केला जातो. मुख्य पाईपलाईन मधून जॅकवेल द्वारे गावच्या पाण्याच्या टाकीत सोडले जाते. दूषित पाणी साधारणतः एप्रिल महिन्यात सोडण्यात आले होते. त्यामुळे गावातील नागरिकांना पाण्याने त्रास सुरु झाला व त्यामध्ये गावातील २ जणांचे बळी गेले. बऱ्याच वेळा मुख्य पाइपलाईन ही व्यवस्थित जरी असली तरी गावातील अंतर्गत असणारी पाईप लाईनला थोड्याफार प्रमाणात जरी गळकी असेल तरी पिण्याच्या पाण्यात सांडपाणी, गटारातील पाणी जाऊन ते दूषित होऊ शकते.



राजूर व आसपासच्या वाडी वस्तीवर आता जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत २५ पथके उपलब्ध केली आहेत. यामध्ये १ डॉक्टर व २ कर्मचारी असा स्टाफ आहे. या पथकाद्वारे आढळलेल्या रुग्णाच्या घरी जाऊन नियमित तपासणी केली जाते. तसेच त्यांच्या कुटुंबातील इतर लोकांची हि तपासणी केली जाते. कावीळ हा आजार दूषित पाण्यामुळे होतो साधारणतः पाण्यात ई कोलाई व टोटल कोलिफॉर या दोन विषाणूमुळे काविळीची लागण होते. पावडर टाकून पाणी शुद्धीकरण केले जाते. पाणी क्लोरिनेशन करण्यावर आरोग्य विभागामार्फत देखरेख ठेवली जाते.

> राजूर मध्ये दूषित पुण्यामुळे साथीच्या आजाराचे प्रमाण जास्त होते. आरोग्य विभागाच्या उपाययोजनेनुसार हि संख्या आटोक्यात आणली आहे. गंभीर स्वरूपाचे आजारी रुग्ण आढळणे प्रमाण कमी झाले आहे. नागरिकांनी पाणी गाळून, उकळून प्यावे. क्लोरिनेशनचे काम ग्रामपंचायत मार्फत चालू आहे.
>
> **डॉ. नारायण वायभासे**
> साथरोग वैद्यकीय अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

# खा. नीलेश लंके यांचे शुक्रवारपासून उपोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अहिल्यानगर :** आहिल्यानगर जिल्ह्यासाठी महत्वाच्या असलेल्या एनएच १६० या महामार्गाच्या रूंदकरणाच्या कामात प्रचंड दिरंगाई होत असल्याने जनतेमध्ये नाराजीचा सुर उमटत असून या नाराजीची दखल घेत खासदार नीलेश लंके हे या कामास सुरुवात करावी, या मागणीसाठी शुक्रवारपासून जिल्हाधिकारी अहिल्यानगर येथे सकाळी ११ वाजल्यापासून बेमुदत उपोषणास बसणार आहेत.

सावळी विहीर ते आहिल्यानगर बायपास या ७५ किमी लांबीच्या फोर लेन महामार्ग रूंदीकरणासाठी भारत कन्स्ट्रक्शन इंडिया प्रा. लि., देहरादून या कंपनीला ठेका देण्यात आला असून २१ मार्च रोजी ठेका करार पार पडला होता. २९ एप्रिल रोजी सबंधित कंपनीस काम मंजुर होउनही आज अखेर कोणतेही काम प्रत्यक्ष सुरू झालेले नाही. त्याविरोधात पत्रव्यवहार करण्यात येऊनही दखल न घेतल्याने खा. लंके यांनी उपोषणाचे हत्यार उगारले आहे.

# संपादकीय

## काय साधले या बैठकीने

ब्राझीलमधील रिओ डी जानेरो येथे झालेल्या 'ब्रिक्स' शिखर परिषदेत भारताने दहशतवादाच्या मुद्द्यावर चर्चा घडवून आणण्यात मोठे यश मिळवले. परिषदेच्या पहिल्या दिवशी सदस्य देशांनी दहशतवादाविरुद्ध कठोर भूमिका घेतली आणि जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला, तो दहशतवादाविरुद्ध एक मोठा उपक्रम मानला जात आहे. या प्रसंगी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की आज दहशतवाद मानवतेसाठी सर्वात गंभीर आव्हान म्हणून उभा आहे. अलिकडेच भारताने एका अमानवी आणि भ्याड दहशतवादी हल्ल्याचा सामना केला. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेला दहशतवादी हल्ला हा भारताच्या आत्म्यावर, ओळखीवर आणि प्रतिष्ठेवर थेट हल्ला होता. हा हल्ला केवळ भारतावरच नाही, तर संपूर्ण मानवतेवर एक आघात होता. या दुःखाच्या वेळी आमच्यासोबत उभ्या राहिलेल्या, पाठिंबा आणि शोक व्यक्त करणाऱ्या मित्र देशांचे मी मनापासून आभार मानतो. दहशतवादाचे बळी आणि समर्थक एकाच तराजूमध्ये तोलता येणार नाहीत. दहशतवादाचा निषेध हे आपले तत्त्व असले पाहिजे, केवळ सोय नाही. हल्ला कोणत्याही देशावर झाला तरी तो मानवतेविरुद्ध विश्वासघात असेल, असा उल्लेख करून ते म्हणाले, की दहशतवाद्यांवर निर्बंध लादण्यात कोणताही संकोच करू नये. वैयक्तिक किंवा राजकीय फायद्यासाठी दहशतवादाला मूक संमती देणे, दहशतवाद किंवा दहशतवाद्यांना पाठिंबा देणे, कोणत्याही परिस्थितीत स्वीकार्ह नसावे. दहशतवादाबाबत शब्द आणि कृतीत फरक नसावा. जागतिक राजकारणामध्ये 'ब्रिक्स' हा एक प्रभावशाली गट म्हणून उदयास आला आहे. त्यात जगातील अकरा प्रमुख उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा समावेश आहे. त्यात चीनचाही समावेश आहे. चीन आणि पाकिस्तानमधील मैत्री सर्वज्ञात आहे. चीन पाकिस्तानला पाठिंबा देत असताना पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत इतकी स्पष्ट आणि कडक भूमिका घेणे हे भारताच्या वर्चस्वाचे आणि पुढाकाराचे उदाहरण आहे. ते भविष्यात या मुद्द्यावर आणखी कठोर पावले उचलण्याचा मार्ग मोकळा करते. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका यासह 'ब्रिक्स'मध्ये सहभागी ११ उदयोन्मुख देश जगातील सुमारे अर्धी लोकसंख्या आणि जागतिक आर्थिक उत्पादनाच्या ४० टक्के वाटा उचलतात. हा गट इतर मुद्द्यांवर मोठ्या प्रमाणात विभागलेला असला, तरी आक्रमक अमेरिकन नेत्याचा आणि त्यांच्या टॅरिफ युद्धांचा विचार केला तर, हे देश एकत्र येण्यासाठी एक समान आधार शोधतात. त्यांनी आपल्या घोषणेमध्ये अमेरिका आणि ट्रम्प यांचे नाव न घेता टीका केली. 'ब्रिक्स' सदस्यांनी एकतर्फी टॅरिफमध्ये वाढ करण्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आणि म्हटले की, या टॅरिफमुळे जागतिक अर्थव्यवस्थेला हानी पोहोचण्याचा धोका आहे. ब्राझील, भारत आणि सौदी अरेबियासारख्या अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांचा विचार करता, घोषणेत कधीही अमेरिका किंवा त्यांच्या अध्यक्षांची नाव घेऊन टीका करण्यात आली नाही. इस्रायल आणि अमेरिकेने आण्विक आणि इतर लक्ष्यांवर केलेल्या लष्करी हल्ल्यांचा 'ब्रिक्स'ने निषेध करत सहकारी सदस्य इराणला पाठिंबा दर्शवला. 'ब्रिक्स'ला अमेरिका आणि पश्चिम युरोपीय शक्तींविरुद्ध प्रतिसंतुलन म्हणून पाहिले जाऊ लागले आहे; परंतु इराण, सौदी अरेबिया आणि इतर देशांचा समावेश करण्यासाठी तसेच गाझा युद्धापासून अमेरिकेच्या जागतिक वर्चस्वाला आव्हान देणाऱ्या मुद्द्यांवर अर्थपूर्ण एकमत होण्यासाठी 'ब्रिक्स'ला संघर्ष करावा लागला आहे.

'ब्रिक्स' देशांनी आपल्या जाहीरनाम्यामध्ये एकत्रितपणे इस्रायल-पॅलेस्टिनी संघर्षावर शांततापूर्ण द्वि-राज्य उपायाची मागणी केली आहे. तथापि, इस्रायलला अस्तित्वात राहण्याचा अधिकार नाही आणि तो रद्द केला पाहिजे, अशी इराणची दीर्घकालीन भूमिका आहे. इराणने घोषणापत्र पूर्णपणे नाकारले नाही; उलट त्यावर स्वाक्षरी केली. शी जिनपिंग यांनी आपल्या बारा वर्षांच्या अध्यक्षपदाच्या काळात पहिल्यांदाच बैठकीला हजेरी लावली नाही. युक्रेनमध्ये युद्ध गुन्ह्यांचा आरोप असलेले रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनीही या बैठकीपासून दूर राहणे पसंत केले. ब्राझीलच्या दौऱ्यानंतर मोदी यांनी अर्जेंटिनाचा दोन दिवसांचा दौरा केला. मोदी यांच्या अर्जेंटिना दौऱ्याने ऐतिहासिकच नाही, तर भारत-लॅटिन अमेरिका संबंधांमध्ये एक धोरणात्मक वळणदेखील आणले. १९६८ नंतर भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच द्विपक्षीय दौरा आहे. मोदी यांनी अर्जेंटिनाचे अध्यक्ष जेवियर माइली यांच्याशी एक महत्त्वाची द्विपक्षीय बैठक घेतली. या चर्चेत संरक्षण उत्पादन, अवकाश तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, ऊर्जा, शेती, व्यापार, दहशतवाद आणि खनिज संसाधने यासारख्या अनेक प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्यावर चर्चा झाली. या भेटीकडे भारत-अर्जेंटिना संबंधांच्या एका नवीन युगाची सुरुवात म्हणून पाहिले जात आहे. भारत आणि अर्जेंटिना यांनी अनेक प्रमुख क्षेत्रांमधील सहकार्याबाबत चर्चा केली. त्यात दोन्ही नेत्यांनी व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रात द्विपक्षीय व्यापार वाढवण्यावर सहमती दर्शवली. या भेटीमध्ये भारत आणि अर्जेंटिनादरम्यान शेती आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये बाजारपेठेतील प्रवेश वाढवण्याबाबत करार झाला. याबाबत लवकरच कृषीवरील संयुक्त कार्यगटाची बैठक होणार आहे. दोन्ही देशांमधील आरोग्य आणि औषध निर्माणसारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्यावर चर्चा झाली. टेलिमेडिसिन, डिजिटल आरोग्य आणि वैद्यकीय प्रशिक्षणात सहकार्य करण्यावरही सहमती झाली. अर्जेंटिनातील शेल गॅसचे विशाल साठे भारतासाठी एक प्रमुख स्वारस्य क्षेत्र म्हणून उदयास आले आहेत. अर्जेंटिना लिथियम, तांबे आणि दुर्मिळ पृथ्वी खनिजांनी समृद्ध आहे. या देशाने २००७ मध्ये भारताने उत्पादित केलेल्या संरक्षण प्रणालींमध्ये रस दाखवला आहे. अर्जेंटिनाने 'इस्रो'कडून आपला पहिला उपग्रह प्रक्षेपित केला आहे. आता दोन्ही देश उपग्रह विकास, प्रक्षेपण सेवा, अनुप्रयोग आणि क्षमता बांधणीमध्ये सहकार्य करतील. मोदी यांनी भारतातील उदयोन्मुख खासगी अंतराळ 'स्टार्टअप इकोसिस्टीम'वर भर दिला. दोन्ही देश संरक्षण तंत्रज्ञान आणि क्षमता भागीदारी मजबूत करण्यास सहमत झाले. मोदी आणि माइली यांच्या 'लंच डिप्लोमसी'मध्ये अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. मोदी यांनी भारताचे ड्रोन शेती, औषध वितरण, सीमा सुरक्षा आणि जमीन सर्वेक्षणात कशी क्रांती घडवत आहेत हे स्पष्ट केले.

# परिस्थिती प्रतिकूल, अर्थव्यवस्थेला अनुकूल

**अर्थनगरीतून**

**– महेश देशपांडे**
**आर्थिक घडामोडींचे जाणकार**

गेला काही काळ युध्दजन्य परिस्थिती, लष्करी संघर्ष आणि थांबवली गेलेली युध्दे यामुळे गाजत राहिला असला तरी शेअर बाजारांच्या बरकतीच्या युद्धात भारताने चीन, अमेरिकेवर मात केलेली पहायला मिळाली. एकंदरीत, प्रतिकूल परिस्थितीमध्येही भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी उत्तम राहिली. दरम्यान, इराणच्या भूमिकेमुळे कच्च्या तेलाच्या दरात पुन्हा वाढ होऊ घातली आहे. त्याकडे मात्र लक्ष ठेवावे लागणार आहे.

गेला काही काळ युध्दजन्य परिस्थिती, लष्करी संघर्ष आणि थांबवली गेलेली युध्दे यामुळे गाजत राहिला असला तरी जगभर अर्थव्यवस्थेवर परिणाम जाणवला. सुदैवाची बाब म्हणजे भारतावर या वातावरणाचा आर्थिक परिणाम पहायला मिळाला नसून शेअर बाजारांच्या बरकतीच्या युद्धात भारताची चीन, अमेरिकेवर मात पहायला मिळाली. एकंदरीत, प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी उत्तम राहिली. दरम्यान, इराणच्या भूमिकेमुळे कच्च्या तेलाच्या दरात पुन्हा वाढ होऊ घातली आहे. त्याकडे मात्र लक्ष ठेवावे लागणार आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून चर्चीत युध्दांपलिकडे तीन देशांमध्ये आणखी एक युद्ध सुरू होते. वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये भारताने हे युद्ध जिंकले आहे. विशेष म्हणजे या युद्धात भारताने जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांना, अर्थात अमेरिका आणि चीनला खूप वाईट पद्धतीने पराभूत केले आहे. गेल्या सहा महिन्यांपासून भारत, अमेरिका आणि चीनमध्ये एक युद्ध चालू होते. या युद्धाचे कुरुक्षेत्र शेअर बाजार हे होते. त्यात भारताने विजय मिळवला आहे. वर्षाच्या पहिल्या सहामाहीमध्ये भारताच्या शेअर बाजाराने अमेरिका आणि चीनच्या शेअर बाजारांना हरवले आहे. एकीकडे भारताच्या शेअर बाजारामध्ये सुमारे सात टक्के वाढ झाली आहे. दुसरीकडे, अमेरिका आणि चीनच्या शेअर बाजारात फक्त तीन ते पाच टक्के वाढ झाली आहे. याचा अर्थ असा की, भारताने आपल्या शेअर बाजारातील गुंतवणूकदारांना अमेरिकन आणि चीनी बाजारांपेक्षा जास्त परतावा दिला आहे. तेही अशा वेळी जेव्हा युक्रेन-रशिया युद्ध, ट्रम्प टॅरिफ, अमेरिका-चीन टॅरिफ वॉर, पाकिस्तानविरुद्ध भारताचे 'ऑपरेशन सिंदूर' आणि इराण आणि इस्रायलमधील युद्ध सुरू होते. गेल्या सहा महिन्यांमध्ये म्हणजेच चालू वर्षात आतापर्यंत मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकाने गुंतवणूकदारांना सुमारे सात टक्के परतावा दिला आहे. याचा अर्थ त्यात ५,३७१.१९ अंकांची वाढ झाली आहे. महिन्याच्या शेवटच्या ट्रेडिंग दिवशी निर्देशांकामध्ये सुमारे ४०० अंकांची घसरण दिसून येत असून तो ८३,६८३.४३ अंकांवर व्यवहार करत आहे. दुसरीकडे, राष्ट्रीय शेअर बाजाराच्या प्रमुख निर्देशांक 'निफ्टी ५०'मध्ये चालू वर्षात सुमारे आठ टक्क्यांची वाढ दिसून आली आहे. याचा अर्थ निफ्टीमध्ये १,८४९.५५ अंकांची वाढ दिसून आली.

दुसरीकडे अमेरिका आणि चीनी बाजारांनी भारताच्या तुलनेत गुंतवणूकदारांना जास्त परतावा दिलेला नाही. अमेरिकन बाजार निर्देशांकाने चालू वर्षात ३.३७ टक्के म्हणजेच १,४२७ अंकांची वाढ नोंदवली, तर नॅसडॅक कंपोझिटमध्ये ५.१५ टक्के म्हणजेच ९९२.६७ अंकांनी वाढ झाली आहे. एस अँड पी ५०० मध्येही वाढ दिसून आली आहे; परंतु ती तितकी जास्त नाही. आकडेवारी तपासल्यास एस अँड पी ५०० ने गुंतवणूकदारांना ५.१९ टक्के म्हणजेच ३०४.५२ अंकांची वाढ दिली आहे. दुसरीकडे, चीनच्या एसएसई कंपोझिट या मुख्य



एक्सचेंजमध्ये चालू वर्षात ५.६३ टक्के म्हणजेच १८३.८० अंकांनी वाढ दिसून आली आहे. जपानच्या निक्केईमध्ये फक्त तीन टक्के वाढ दिसून आली आहे. विशेष म्हणजे गेल्या तीन महिन्यांमध्ये म्हणजेच एप्रिल ते जून या काळात शेअर बाजारात दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे परदेशी गुंतवणूकदारांनी भारतात केलेली गुंतवणूक. जानेवारी ते मार्च या काळात परदेशी गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातून १,१६,५७४ कोटी रुपये काढले होते. त्यामुळे मोठी घसरण दिसून आली. दुसरीकडे, एप्रिल ते जून या काळात एफआयआयनी शेअर बाजारात ३२,९९८ कोटी रुपये गुंतवले आहेत. त्याचा परिणाम शेअर बाजारात वाढीच्या स्वरूपात दिसून आला आहे. तसे, एकूणच पाहिल्यास, चालू वर्षात गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातून ८३,५७६ कोटी रुपये काढले आहेत.

याच सुमारास अर्थ मंत्रालयाच्या बैठकीत म्हटले आहे की, २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला भू-राजकीय तणाव असूनही भारताच्या अर्थव्यवस्थेने मजबूत आणि लवचिक कामगिरी केली. देशाची आर्थिक परिस्थिती स्थिर आणि सकारात्मक आहे. आंतरराष्ट्रीय अस्थिरतेच्या वातावरणातही भारताच्या अर्थव्यवस्थेने ताकद दाखवली आहे. तिला सुधारित देशांतर्गत मागणी, महागाईत घट, स्थिर रोजगार आणि निर्यात क्षेत्राच्या बळकटीने पाठिंबा दिला आहे. अहवालात पुढे म्हटले आहे की, ई-वे बिल, इंधन वापर आणि पीएमआय निर्देशांक यासारखे उच्च-फ्रिक्वेन्सी निर्देशक पुष्टी करतात की आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या सुरुवातीलाही आर्थिक क्रियाकलाप स्थिर राहिले आहेत. रब्बी पिकांचे चांगले पीक आणि सकारात्मक मॉन्सूनच्या अंदाजामुळे ग्रामीण भागात मागणीत वाढ झाली आहे. वाढत्या पर्यटन आणि व्यावसायिक प्रवासामुळे शहरी वापराला चालना मिळत आहे, जे हवाई प्रवास आणि हॉटेल बुकिंगमध्ये वाढ झाल्यामुळे दिसून आले आहे. तथापि, अहवालात म्हटले आहे की बांधकाम साहित्य आणि वाहनविक्रीसारख्या काही क्षेत्रांमध्ये मंदीची चिन्हे दिसून आली आहेत. मे २०२५ मध्ये अन्न आणि किरकोळ महागाईमध्ये सतत आणि व्यापक घट नोंदवली गेली. याला मजबूत कृषी उत्पादन आणि सरकारी हस्तक्षेप कारणीभूत होता.

जागतिक घडामोडींमुळे २०२५ च्या सुरुवातीला व्यापार तणाव वाढला. त्यामुळे वित्तीय बाजारपेठांमध्ये अस्थिरता निर्माण झाली. तथापि, दुसऱ्या तिमाहीमध्ये परिस्थिती काही प्रमाणात सामान्य झाली. मे महिन्यात भारतीय सरकारी बाँड बाजाराने स्थिरता आणि आत्मविश्वास राखला. याचे मुख्य कारण भारतीय रिझर्व्ह बँकेने विक्रमी लाभांशाची घोषणा आणि आर्थिक वर्ष २०२५ च्या शेवटच्या तिमाहीमध्ये मजबूत वाढ होती. यामुळे सरकारी बाँडवरील जोखीम प्रीमियम १८२ बेसिस पॉइंट्सपर्यंत खाली आला. भारताच्या एकूण निर्यातीमध्ये (वस्तू आणि सेवा) मे २०२५ मध्ये वार्षिक २.८ टक्के वाढ नोंदवली गेली, जी जागतिक आर्थिक मंदी आणि टॅरिफ अस्थिरता असूनही निर्यात क्षेत्राची ताकद दर्शवते. १३ जूनपर्यंत देशाचा परकीय चलन साठा ६९९ अब्ज डॉलर राहिला. इतर जागतिक चलनांच्या तुलनेत भारतीय रुपया मध्यम अस्थिरतेसह स्थिर राहिला. अहवालात म्हटले आहे, की कामगार बाजारदेखील स्थिरतेकडे वाटचाल करत आहे. एआय/एमएल, विमा, रिअल इस्टेट, बीपीओ/आयटीईएस आणि हॉस्पिटॅलिटी यासारख्या क्षेत्रांमध्ये 'व्हाईट-कॉलर' नोकऱ्यांमध्ये तेजी दिसून आली. 'पीएमआय'च्या रोजगार उप-निर्देशांकात जलद वाढ दिसून आली, जी मजबूत रोजगारनिर्मिती दर्शवते. याव्यतिरिक्त, 'ईपीएफओ' डेटा औपचारिक रोजगारात सतत सुधारणा दर्शवतो.

दरम्यान, इराण आणि इस्रायलमध्ये युद्धबंदी झाली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीनंतर १२ दिवसांचे युद्ध थांबले. तथापि, इराणला याबद्दल अद्याप खात्री नाही. इराणला पुन्हा युद्ध सुरू होण्याचा धोका वाटत आहे. इराणने म्हटले आहे की इस्रायलसोबतची युद्धबंदी टिकेल की नाही याबद्दल त्यांना शंका आहे. दुसरीकडे, कोणत्याही नवीन हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यास हा देश तयार आहे. मध्यपूर्वेतील देशांमध्ये पुन्हा सुरू होणाऱ्या युद्धाच्या कुजबुजीचा परिणाम कच्च्या तेलावर म्हणजेच काळ्या सोन्यावर दिसून येत आहे. कच्च्या तेलाच्या किमती पुन्हा वाढत आहेत. इराणच्या अर्ध-सरकारी 'फार्स' या वृत्तसंस्थेने सशस्त्र दल प्रमुख अब्दुल रहीम मौसावी यांच्या विधानांच्या आधारे दावा केला आहे की युद्धबंदी आणि त्याच्या आश्वासनांना चिकटून राहण्याच्या शत्रूच्या हेतूबद्दल इराणच्या मनात गंभीर शंका आहेत. पुन्हा हल्ला झाला तर इराण जोरदार प्रत्युत्तर देण्यास तयार आहे. 'ब्लूमबर्ग'च्या मते मौसावी यांनी अलिकडेच सौदी संरक्षण मंत्री खालिद बिन सलमान यांच्याशी फोनवर चर्चा केली. त्यात इराण आणि इस्रायलने २४ जून रोजी युद्धबंदीची पुष्टी केली. त्यामुळे सुमारे दोन आठवड्यांपासून सुरू असलेल्या लष्करी कारवाया संपल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल'वर युद्धबंदीची घोषणा केल्यानंतर काही तासांमध्येच ही घोषणा केली. १३ जून रोजी इस्रायली हल्ल्याने इराण-इस्रायल तणाव सुरू झाला. त्यात अनेक वरिष्ठ इराणी लष्करी अधिकारी आणि शास्त्रज्ञ मारले गेले. इस्रायली हल्ल्यात ज्येष्ठ लष्करी नेते मोहम्मद बघेरीदेखील मारले गेले. यदाकदाचित इराण आणि इस्रायलमध्ये पुन्हा युद्ध झाले आणि इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला तर संपूर्ण जगाच्या तेलाच्या किमतींवर परिणाम दिसून येईल. जागतिक तणावामुळे ब्रेंट क्रूड तेलाच्या किमती वाढू शकतात.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## ... आता कर्नाक नव्हे, सिंदूर पूल

प्रत्येकाचे वजन ५५० मेट्रिक टन आहे. हे गर्डर ७० मीटर लांब, २६.५ मीटर रुंद आणि १०.८ मीटर उंच आहेत. ते आरसीसी खांबांवर बसवले आहेत.

१९ ऑक्टोबर २०२४ रोजी गर्डर यशस्वीरित्या बसवण्यात आला. २६ आणि ३० जानेवारी २०२५ रोजी उत्तरेकडील गर्डर बसवण्यात आला. यासाठी मध्य रेल्वेने विशेष मेगा ब्लॉक घेतला. या दरम्यान, ५५० टन वजनाचा गर्डर रेल्वे ट्रॅकपासून ५८ मीटर वर उचलण्यात आला. मुंबई महानगरपालिकेच्या म्हणण्यानुसार, नंतर तो सुमारे २ मीटर खाली आणण्यात आला आणि आरसीसी खांबांवर योग्यरीत्या बसवण्यात आला.

## नगर शहरातच वैद्यकीय महाविद्यालय होणार

अहिल्यानगर शहरातच होणार अशी जोरदार घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करून आ. जगताप यांना आश्वासन दिले.

दिलेल्या निवेदनात आ. जगताप यांनी नमूद केले आहे की, अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर झाले आहे. हे महाविद्यालय शहरातील मध्यवर्ती ठिकाणी होणे गरजेचे आहे. जेणेकरुन शहरातील सर्व नागरीकांसाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सोयीचे होईल.

## बच्चू कडूंच्या यात्रेला मनसेचा पाठिंबा?

प्रहार जनशक्ती पक्षाने दिली आहे.

या यात्रेची सुरुवात ७ जुलै रोजी देशाचे माजी कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथून झाली. माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा उंबर्डा बाजार, मानकी, वळसा, तिवरी, तुपटाकळी, काळी दौलत, गुंज अशा गावांमधून मार्गक्रमण करत चिलगव्हाण येथे साहेबराव करपे यांच्या गावी समाप्त होणार आहे. जिथे देशातील पहिल्या शेतकरी आत्महत्येची नोंद झाली होती. सुमारे १३८ किलोमीटरच्या या यात्रेत शेतकरी आणि विविध पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले असून, सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, अशी मागणी ते करत आहेत.

## परमबीर सिंग यांना क्लीनचीट

अहवाल मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांकडे सादर केला आहे. सीबीआयच्या म्हणण्यानुसार, २०१६-१७ मध्ये घडलेल्या या प्रकरणात गुन्हा सिद्ध करण्यासाठी पुरेसे पुरावे मिळाले नाहीत, तसेच कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळली नाही.

सीबीआयने आपल्या अहवालात नमूद केले की, तक्रारदार अग्रवाल यांचा आर्थिक व्यवहारात अप्रामाणिकपणाचा इतिहास आहे आणि ते खोट्या दिवाणी व फौजदारी खटल्यांद्वारे लोकांना अडकवण्यासाठी ओळखले जातात. तसेच, अग्रवाल आणि बिल्डर संजय पुनमिया यांच्यातील समझोता कोणत्याही दबावाशिवाय किंवा जबरदस्तीशिवाय झाल्याचे तपासात आढळले आहे. परमबीर सिंग यांच्याविरुद्ध मुंबईतील मरिन ड्राइव्ह, गोरेगाव, अकोला आणि ठाणेनगर पोलीस ठाण्यांमध्ये एकूण पाच गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी कोपरी पोलीस ठाण्यातील खंडणी प्रकरणात सीबीआयने तपास बंद केला आहे, परंतु इतर चार प्रकरणांचा तपास अद्याप सुरू आहे.

## दफनविधीची तयारी सुरू, अन् बाळाचा आला आवाज

झाल्याचे समजताच त्याच्या आई-वडिलांनी हंबरडा फोडला होता. पण दफन करण्याच्या काही क्षण अगोदर ते बाळ रडायला लागल्याचे समोर आले आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील होळ येथील एका कुटुंबातील महिलेची ७ जुलै रोजी २०२५ रोजी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय विद्यालयात प्रसूती झाली होती. यावेळी नवजात बाळाचा मृत्यू झाला होता, असे सांगण्यात आले होते. डॉक्टरांनी सर्व तपासण्या करून तसा निर्णय देऊन टाकला होता. डॉक्टरांनीच आपले बाळ मृत असल्याचे सांगितल्यानंतर नुकतेच प्रसूत झालेल्या महिलेने आणि तिच्या पतीनेही बाळ जिवंत असल्याची आशा सोडून दिली होती. त्यानंतर या बाळाला दफन करण्याची प्रक्रिया चालू करण्यात आली. विशेष म्हणजे दफन करण्याआधीच अचानक बाळाच्या किंकाळ्या ऐकायला आल्या. बाळ दफन करण्याच्या काही मिनिटे अगोदरच बाळ जिवंत झाल्याचे समोर आले. नवजात बाळाच्या आजीने बाळाचा चेहरा बघण्याचा अट्टाहास केल्याने हा सगळा प्रकार समोर आला.

**रुग्णालय प्रशासनावर गंभीर प्रश्न उपस्थित**

दरम्यान, विशेष म्हणजे हे नवजात बाळ १० ते १२ तास शव पेटीत ठेवण्यात आलं होतं. तरी ते दफनविधीच्या अगोदर जिवंत झालं. ही बाब समोर येताच नवजात बाळाला तातडीने अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या बाळावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. हा प्रकार समोर आल्यानंतर आता डॉक्टरांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत. डॉक्टरांनी बाळाची नीट तपासणी केली होती का? असे विचारले जात असून याबाबत योग्य ती कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

**पाच जणांची समिती स्थापन, चौकशी होणार?**

डॉक्टरांनी याबाबत रुग्णालयाची भूमिका स्पष्ट केली आहे. या संदर्भात पाच लोकांची समिती तयार करण्यात आली असून यामध्ये जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे रुग्णालयाने सांगितले आहे.

## कुंभमेळापुर्वी नगर-सावळीविहीर रस्ता पूर्ण होणार

पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री भोसले यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये प्रामुख्याने शेवगाव बाह्यवळण रस्त्याच्या कामाचे तयार करण्यात आलेल्या आराखड्याची माहिती अधिकाऱ्यांनी बैठकीत सादर केली. रस्त्याच्या कामासाठी करावे लागणारे भूसंपादन आणि यासाठी निधी उपलब्धतेचा आढावाही घेण्यात आला.

मात्र सदरचा मार्ग दोन विभागांना जोडणारा असल्याने काम करताना मार्ग चौपदरी कसा होईल, हा दृष्टीकोन ठेवून कामाचे नियोजन करावे, अशा सूचना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी बैठकीत दिल्या.

अहिल्यानगर ते सावळीविहीर या रस्त्याच्या कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण होवून का ाच्या सूचनाही निर्गमित झाल्या आहेत. सुमारे ५१५ कोटी रुपयांचा निधी यासाठी मंजूर असून कुंभमेळाच्या दृष्टीने या रस्त्याचे काम पूर्ण करण्याच्या सूचना बैठकीत दिल्या. कामाच्या गुणवतेत कोणतीही तडजोड न करण्याचे निर्देश पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहे.

## ... आता गणेशोत्सव महाराष्ट्राचा राज्योत्सव

महत्त्वपूर्ण बातमी समोर येत आहे. भाजप नेते आशिष शेलार यांनी आगामी गणेशोत्सवाबद्दल एक मोठी घोषणा केली आहे. महाराष्ट्राचा गणेशोत्सव हा आता महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून ओळखला जाईल, अशी घोषणा आशिष शेलार यांनी केली.

आशिष शेलार काय म्हणाले की, हेमंत रासने यांच्या या मागणीला मंत्री आशिष शेलार यांनी दुजोरा देत उत्तर दिले. महाराष्ट्राचा गणेशोत्सव हा १८९३ रोजी लोकमान्य टिळकांनी सुरू केला. त्यापूर्वी घरोघरी हा उत्सव सुरु होता. महाराष्ट्र राज्याचा गौरव आणि अभिमान असलेला गणेशोत्सव हा आता आपण महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून राज्य सरकार घोषित करेल हे आजच मी स्पष्टीकरण देतो. देशात आणि जगात गणेशोत्सवाची व्यापती आणि प्रचार याबद्दल महाराष्ट्र सरकार कटीबद्ध राहिल, असे आशिष शेलार यांनी म्हटले.

## गटार सफाईदरम्यान कर्मचाऱ्याचा मृत्यू

नागरिक त्रस्त होते. याठिकाणी गटार तुंबल्याची तक्रार झाल्यानंतर सफाईसाठी नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना पाठवण्यात आले. जवळपास १५ ते १७ फूट खोल असलेल्या मुख्य चेंबरमध्ये एक कर्मचारी उतरला असता, आत तयार झालेल्या विषारी गॅसमुळे तो गुदमरून खाली कोसळला.

त्याला वाचवण्यासाठी दुसरा कर्मचारी खाली उतरला, परंतु, तोही गॅसमुळे बेशुद्ध झाला. त्यानंतर आणखी दोन कर्मचारी मदतीसाठी उतरले, त्यापैकी एकाला श्वास घेणे कठीण झाले. ही बाब लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी आरडाओरड केला. त्यानंतर पालिकेचे बचाव पथक, अग्निशमन दल, पोलिस यंत्रणा त्याचबरोबर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने मदतीसाठी धावले. त्यानंतर या अडकलेल्या कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यात आले.

तातडीने जखमींना संगमनेर ग्रामीण रुग्णालय व खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, यामध्ये एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, नगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुरक्षा साधने न वापरता कर्मचाऱ्यांना खोल गटारात उतरवले जात आहे, ही पूर्णतः दुर्लक्षाची आणि जबाबदारी झटकण्याची वृत्ती आहे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने जबाबदारी स्वीकारून तत्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमध्ये जोर धरत आहे.

## गेम हरला अन् स्वतःही संपला

खेळताना अचानक विंजो मोबाईल गेम ॲप डाऊनलोड करीत त्यावर १२०० रुपये हरला. त्यानंतर घाबरुन त्याने स्वत: गळफास घेत लाखमोलाचे आयुष्य संपवल्याची घटना उघडकीस आली आहे.

सम्राट भालेराव या हा दोन बहिणींच्या पाठीवरती एकुलता एक असलेला मुलगा गमावल्याने आई-वडीलांनी टाहो फोडला आहे. त्याने त्याच्या आईच्या मोबाईलमध्ये विंजो मोबाईल गेम ॲप डाऊनलोड केला होता. त्यावर खेळताना त्याने १२०० रुपये गमावले, त्यातून तो नैराश्यात गेला आणि त्याने गळफास लावून आत्महत्या केली. त्याच्या अशा आत्महत्येने सगळं कुटुंब हादरले आहे.

फायदा होतो म्हणून सम्राट हा गेम खेळत गेला. त्याला काही प्रमाणात पैसेही मिळाले त्यातून तो चैनीच्या वस्तू खरेदी करीत गेला. मात्र एका विशिष्ट काळानंतर मात्र तो या गेममध्ये पैसे हरू लागला. त्यानंतर त्याने आपल्या कुटुंबियांकडून देखील पैसे घेऊन हा गेम खेळणे सुरूच ठेवले. त्यामुळे या ऑनलाईन गेममध्ये लहान मुलं आणि तरुण सुरुवातीला मिळणाऱ्या पैशाच्या लालसेपोटी अडकत जातात आणि नंतर मात्र एका विशिष्ट स्टेपनंतर या ऑनलाइन गेममध्ये पैसे हरू लागतात. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांकडे लक्ष द्यायला हवं असे सायबर तज्ज्ञांनी म्हटले आहे.

# दुर्जनास सन्मार्गाला लावणारे हे सद्गुरु असतात

## महंत रामगिरी महाराज; सराला बेटात गुरूपौर्णिमा उत्सव उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** गुरूशिष्य परंपरा ही आपल्या भारतीय संस्कृतीचे एक मोठेच वैशिष्ट्य आहे. आज जे कोणी अध्यात्मविद्या जाणणारे संत सत्पुरुष आपल्याला दिसतात ते सर्व सद्गुरूशरण आहेत. शिष्याच्या जीवनातील अंधकार दूर करून ज्ञानरूपी प्रकाश हे गुरुच दाखवतात, भारतीय इतिहासामध्येही मोठमोठे दुर्जन यांनाही महापुरुष सद्गुरुंनीच सन्मार्गाला लावल्याचे अनेक उदाहरणे आहेत. प्रभू श्री रामचंद्र, भगवान श्रीकृष्ण हे दैवी अवतार देखील त्यांच्या मानवी लीलेमध्ये वसिष्ठ, सांदीपनी या गुरूंपुढे नतमस्तक झाले. आपण ही योगीराज गंगागिरी महाराज, ब्रम्हलिन नारायणगिरी महाराज यांच्या पुढे नतमस्तक आसल्याचे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले.


(छाया : नंदु निकम)

लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र गोदा धाम सराला बेटावर गुरूपौर्णिमेला भाविकांची अलोट गर्दी झाली होती. सकाळी ७ वाजता महंत रामगिरी महाराज यांनी सद्गुरु योगीराज गंगागिरी महाराज, ब्रम्हलिन नारायणगिरी महाराजांच्या चरणपादुकांना जलाभिषेक करुन समाधिमंदीर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले.

यावेळी गुरुस्तुतीपर आयोजित किर्तनातुन महंत रामगिरी महाराज पुढे म्हणाले की, अज्ञानरुपी अंधकारात ज्ञानाचा प्रकाश सदगुरू टाकतात. ज्ञान निर्माण करता येत नाही, ज्ञान नष्ट पण होत नाही, तसेच ज्ञान प्राप्त करता येत नाही तर सदगुरू ज्ञान प्रगट करून देतात.

सद्गुरूंचा केवळ देह म्हणजे सद्गुरू नव्हेत. सच्चिदानंद हे सद्गुरूंचे स्वरूप आहे.

सत्शिष्यदेखील सद्गुरुकृपेने हा आनंद अनुभवतो. जो स्वतःला देह मानतो, तो या आनंदाला पारखा होतो. स्वतःला देह मानणे हे अज्ञान आहे. स्वतःला या देहापुरते सीमित केल्यामुळे तो असीम आनंद अनुभवण्याची क्षमता गमावून बसतो. खरोखर ही देहबुद्धीच सर्व दुःखांचे कारण आहे. देहबुद्धीलाच बोलीभाषेमध्ये मी पणा अथवा अहंकार असे म्हणतात. जसे एखाद्या आईला आपल्या मुलाचे रडणे पाहावत नाही, लगेच ती त्याचे रडणे थांबवते. तसेच सद्गुरू मातृवत्सल असल्यामुळे त्यांना आपला शरणागत शिष्य दुःखी असल्याचे पाहावत नाही. ते आपल्या कृपाशक्तीने शिष्याच्या दुःखांचे कारण असलेली देहबुद्धी नष्ट करतात.

# खताळ यांच्या हस्ते महाप्रसाद वाटप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त शहरातील पंचायत समिती परिसरातील श्री अश्वेश्वर महादेव हिंदू मंडळ व आमदार अमोल खताळ प्रतिष्ठानच्या वतीने शिर्डी येथे साई दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांसाठी आयोजित महाप्रसाद वाटपाच्या कार्यक्रमात आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांनी सहभागी होत भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले.

गुरुपौर्णिमेनिमित्त दरवर्षी हजारो भाविक शिर्डी येथे पायी दर्शनासाठी जात असतात. हे भाविक शहरातील दिल्ली नाका, पंचायत समिती परिसरातून शिर्डी येथे जात असतात. या भाविकांसाठी पंचायत समिती, दिल्ली नाका परिसरातील श्री अश्वेश्वर महादेव हिंदू तरुण मित्र आमदार अमोल खताळ प्रतिष्ठान यांच्या वतीने महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी भारतीय जनता पक्षाच्या शहराध्यक्ष पायल ताजणे यावेळी आवर्जून उपस्थित होत्या. याप्रसंगी मंडळाचे शिवम गुंजाळ, विलास घुगे लालू गुंजाळ, निलेश गाडेकर, दीपक वाघमारे, प्रदीप गुंजाळ, सौरभ गुंजाळ, आदित्य नवले, सागर घुगे, प्रदीप राजपूत, हेमंत गाडेकर, निखिल धुमसे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था

## कोपरगावमध्ये पादचाऱ्यासह असंख्य वाहनधारक दुखापतग्रस्त



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** शहराला जोडणाऱ्या तसेच कोपरगाव रेल्वेस्टेशन रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असुन त्यास मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. असंख्य वाहनधारक दुखापतग्रस्त होवुन दवाखान्यात उपचार घेत आहेत तर अनेकजण कायमचे जायबंदी झाले आहे. तेव्हा सार्वजनिक बांधकाम खात्याने याकडे लक्ष घालुन त्याची दुरूस्ती करावी, अशी प्रवाशांसह असंख्य वाहनधारकांनी मागणी केली आहे.

साईबाबा कॉर्नर ते कोपरगाव रेल्वेस्टेशन हा रस्ता अत्यंत वर्दळीचा आहे. त्याचे काम होवून पाच वर्षे देखील झालेले नाही. रस्ता जागोजागी फुटला आहे, अनेक ठिकाणी मधोमध काटेरी झुडपे वाढली आहे, खडडयांची दुरूस्ती करण्यांत आली पण ती एक महिनाभरही टिकली नाही. सध्या पावसाळयाचे दिवस आहे. पाउस होवुन या रस्त्यावर मोठ्या प्रमाणांत पाणी साठते. हे पाणी जाण्यासाठी असणारी यंत्रणा बुजून गेली आहे, परिणामी पाणी रस्त्यातच थांबते. त्यामुळे रस्त्यावर मोठाले खड्डे पडले आहेत.

# समाजाला दिशा देण्याचे काम गुरू करतो

## शिक्षणाधिकारी बुगे; अळकुटी महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालय शिक्षणापर्यंतचा प्रवास हा युवकांना घडविण्याचे काम करतो. समाजाला दिशा देण्याचे काम गुरू करतो, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या योजना विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अळकुटी महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने गुरुपौर्णिमा व प्रथम वर्ष विद्यार्थी स्वागत



समारंभानिमित्त महाविद्यालयात विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी पंचायत समितीचे माजी सदस्य दिनेश बाबर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना म्हणाले की, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी प्रवरा शिक्षण संस्थेचा जो वटवृक्ष उभा केला. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सुविधा निर्माण झाली.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी केले. याप्रसंगी पारनेर खरेदी-विक्री संघाचे व्हाईस चेअरमन प्रसादराव शितोळे, शिनारे सर, प्रा. अर्जुन चाटे, गोरख घोलप, सूर्यमाला भोर, प्रा. विशाल रोकडे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. संजय जाधव, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. विनायक सोनवणे, प्रा.पोपट सुंबरे आदी उपस्थित होते.

# श्रीरामपुरात तरुणावर कत्तीने केले वार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** उसने दिलेल्या १५ हजार रुपयांची मागणी करताच तरुणाला कत्ती मारून जखमी करण्यात आले.

गळ्यातील ३० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन हिसकावून घेण्यात आली. याप्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यात भेर्डापूर येथे हा प्रकार घडला. प्रदीप भानुदास मोहिते यांच्या फिर्यादीवरून सोमनाथ कुसळकर (रा. टाकळीभान) याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. कुसळकर यास एक महिन्यापूर्वी मुलाच्या दवाखान्यातील उपचारासाठी १५ हजार रुपये उसने दिले होते. मात्र, त्याने ते परत केले नाही. पैशांची मागणी करताच त्याने शिवीगाळ केली व मोहिते यांच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून घेतली. खिशातला मोबाईल बळजबरीने काढून घेतला. कत्तीने वार करून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, कुळकर यांनीही दुसरी फिर्याद दाखल केली आहे. त्यात भानुदास मोहिते यास पैसे मागितले असता त्याने राग धरून लोखंडी रॉडने मारहाण केल्याचे म्हटले आहे. त्यावरून प्रदीप मोहिते, भानुदास मोहिते व त्याची आई, बायको, भाऊ यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# गोंडेगाव ते उंदिरगाव रस्त्याची दुरवस्था

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणतांबा :** श्रीरामपूर तालुक्यातील गोंडेगाव ते उंदिरगाव रस्त्याची बिकट अवस्था झाली आहे. या रस्त्यावरून जाताना अनेक अपघात घडत आहे. रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळालेली आहे. मात्र, नेमकं घोडे कुठे अडले, असा सवाल गोंडेगावकरांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला विचारला आहे.काल गोंडेगाव येथील रहिवाशी दादासाहेब थोरात हे या रस्त्यावरून जाताना त्यांचा अपघात होवून त्यांच्या पायाला गंभीर जखम झाल्याची घटना घडली. या रस्त्यावरून ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी तसेच सरला बेटकडे जाण्यासाठी अनेक भाविक याच रस्त्याने येत असल्याने रस्त्यावर नेहमी वर्दळ असते. तरी या रस्त्याचे आठ दिवसाच्या आत काम न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिली आहे

# ब्रिज कोर्सच्या नोंदणीला 'आयएमए'चा विरोध

## शासनाच्या निर्णयाचा निषेध; आंदोलनाचा दिला इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** सीसीएमपी ब्रिज कोर्स केलेल्या बीएचएमएस डॉक्टरांची नोंदणी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या स्वतंत्र नोंदवहीत करण्याचा शासनाचा निर्णय चुकीचा असून, तो रुग्णांच्या जीविताशी खेळ करणारा आहे, असा तीव्र निषेध इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) श्रीरामपूर शाखेने पत्रकार परिषदेत केला. निर्णय मागे घेतला नाही, तर राज्यव्यापी आंदोलनाचा इशाराही



> सीसीएमपी कोर्समधून आधुनिक औषधोपचार, सर्जरी, आपत्कालीन व्यवस्थापनाचे सखोल प्रशिक्षण मिळत नाही. त्यामुळे अशा डॉक्टरांना आधुनिक वैद्यक उपचार तज्ज्ञ मान्यतेमुळे रुग्ण गोंधळात पडतील, चुकीचे निदान होईल आणि आरोग्य धोक्यात येईल. रुग्णांनी डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता आणि नोंदणी तपासूनच उपचार घ्यावेत, असा सल्ला देण्यात आला.

देण्यात आला.

या परिषदेत अध्यक्ष डॉ. अतुल करवा, आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ. रवींद्र कुटे, डॉ. भूषण देव, डॉ. दिलीप पडघन, डॉ. अजित देशपांडे, डॉ. रवींद्र जगधने, डॉ. माधवी राजे, डॉ. सपना करवा, डॉ. संकल्प शिरसाठ आदी उपस्थित होते.डॉ. करवा म्हणाले, आमचा कोणत्याही पॅथीला (पद्धतीला) विरोध नाही. मात्र, सरकार दोन वैद्यकीय शिक्षणपद्धती कृत्रिमरित्या एकत्र करत आहे. एमबीबीएस आणि बीएचएमएस अभ्यासक्रमातील कोणताही उपचार घेण्याआधी संबंधित डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता आणि नोंदणी क्रमांक तपासावा. अपघात, शस्त्रक्रिया वा आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीत फक्त एमबीबीएस, एमडी, एमएस किंवा डीएनबी पात्रता असलेल्या डॉक्टरांकडे उपचार घ्यावेत. आरोग्य हा तुमचा मूलभूत हक्क आहे आणि तो योग्य, सखोल प्रशिक्षण घेतलेल्या डॉक्टरांकडे सुरक्षित आहे, असे मत आयएमए श्रीरामपूर शाखेने नोंदवले.

# सडे गावाच्या उपसरपंचपदी अनीता बारहाते



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील सडे ग्रामपंचायतीच्या विद्यमान उपसरपंच मीराबाई सुदाम बारहाते यांनी रोटेशननुसार आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर काळे गटाच्या अनीता संतोष बारहाते यांची बिनविरोध करण्यात आली आहे.सडे ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या उपसरपंचपदासाठीची निवडणूक प्रक्रिया नुकतीच सरपंच आशाताई बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपसरपंचपदासाठी निर्धारित वेळेत अनीता संतोष बारहाते यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत असलेले ग्रामसेवक चंद्रकांत जोशी यांनी अनीता संतोष बारहाते यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी सदस्य नितीन बारहाते, सिध्दार्थ मोकळ, सागर गोरे, मिनाताई कुसाळकर, रावसाहेब बारहाते, बापुराव बारहाते,अशोक बारहाते, गोपीनाथ बारहाते, विजय बारहाते, रमेश वाकचौरे, सुदाम बारहाते, गोकुळ बारहाते, सतिष बारहाते, सुनिल बारहाते, संजय बारहाते, कैलास बारहाते, अनिल बारहाते, रोषण बारहाते उपस्थित होते.

# संजीवनीच्या विद्यार्थ्यांना रिलायन्स कंपनीत नोकरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव:** संजीवनी अभियांत्रिकांच्या चार विद्यार्थ्यांची रिलायन्स कंपनीत नोकरीसाठी निवड झाली आहे.

संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचा ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभाग विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या संपर्कात राहुन आपल्या विद्यार्थ्यांकडून कंपन्यांच्या गरजेनुसार मुलाखतींची तयारी करून घेतो. अशाच प्रयत्नातुन रिलायन्स इंडस्ट्रिज प्रा. लि. कंपनीचा कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. यात अंतिम वर्षातील चार विद्यार्थ्यांची लाखोंच्या वार्षिक पॅकेजवर कंपनीने नोकरीसाठी निवड केली आहे, अशी माहिती संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या अधिकृत सुत्रांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.




पत्रकात पुढे म्हटले आहे की, रिलायन्स कंपनीने निवड केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरंगच्या विक्रम जालिंदर जगताप, शेखर सुदाम गायकवाड व इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या स्वप्नील दिनकर अनप आणि विशाल दत्तात्रय पुंड यांचा समावेश आहे. रिलायन्स कंपनी कडून चांगले वार्षिक पॅकेज मिळणार या अनुषंगाने ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने आपल्या विद्यार्थ्यांकडून मुलाखतींचा भरपुर सराव करून घेतला. यात कंपनीने गरजेनुसार चार नवोदित अभियंत्यांची निवड केली. कंपनीने नोकरीचे ठिकाण कळविताच चारही नवोदित अभियंते रिलायन्सच्या सेवेत रूजु होतील.

# कोपरगाव शहरात आ.आशुतोष काळेंच्या हस्ते वृक्षारोपण

## पुष्पाताई काळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** बचत गटाच्या महिलांना आर्थिक स्वावलंबनाची दिशा दाखवणाऱ्या गौतम बँकेच्या माजी संचालिका व प्रियदर्शनी महिला मंडळाच्या अध्यक्षा पुष्पाताई काळे यांच्या वाढदिवसानिमित्त कोपरगाव शहरातील प्रभाग क्र. ४ मध्ये डॉ. कुणाल घायतडकर व डॉ. भाग्यश्री घायतडकर यांच्या पुढाकारातून सप्तशृंगी देवी मंदिर परीसर व श्री दत्त मंदिर परीसरात आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

आ. काळे म्हणाले की, झाडं ही केवळ हरित छटा नसून, ती आपल्या भविष्याचा श्वासं आहेत. वाढत्या प्रदूषणाच्या संकटात, एक झाड लावणं म्हणजे केवळ रोपटं रोवणं नव्हे, तर ते जगवून पर्यावरणाचं नातं जोपासणं आहे. माझी आई पुष्पाताई काळे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करतांना मला समाधान वाटतं की, आपण पर्यावरणाच्या संवर्धनाचा वसा घेत आहोत. निसर्गाचा समतोल राखल्याशिवाय विकासाचं चक्र पूर्ण होऊ शकत नाही. निसर्गाने आपल्याला अन्न,



पाणी, हवा, औषधे दिली. झाड लावणं ही त्या ऋणाची परतफेड म्हणून प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणं ही आपली सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी कोपरगाव नगरपरिषद सुहास जगताप, सामाजिक वनीकरण अधिकारी निलेश रोडे, समृद्धी व्यवस्थापक हर्षा पाटील, बचतगट सहाय्यिका हेमा तवरेज, शारदा इंग्लिश मीडियम स्कूल चे प्राचार्य कल्याण वाघचौरे, राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी जिल्हाअधक्ष कृष्णा आढाव, शहराधक्ष सुनील गंगुले, विशाल जगताप आदी उपस्थित होते.

### पुष्पाताईंचे काम आदर्शवत

पुष्पाताई काळे यांनी बचत गटाच्या महिलांच्या आर्थिक उत्कर्षासाठी दिलेलं योगदान खूप मोलाचे आहे. त्यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त प्रेरणादायी आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यासाठी समाजात पर्यावरण संवर्धनाचा संदेश जावा या उद्देशातून वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला असल्याचे डॉ. कुणाल घायतडकर यांनी सांगितले.

# डॉ. सूर्यवंशी दाम्पत्याकडून शासनाची फसवणूक?

## बनावट कागदपत्रांच्या आधारे मिळविल्या नर्सिंग, फार्मसी व पॉलिटेक्निकला मंजुरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील डॉ. सुहास बिभीषण सूर्यवंशी व डॉ. पल्लवी सुहास सूर्यवंशी यांनी चेतना सेवा संस्था लातूर या संस्थेमार्फत साकत येथे नर्सिंग, फार्मसी व पॉलिटेक्निक या चारही कॉलेजसाठी एकच इमारत व तीच जमीन दाखवून कॉलेजला मंजुरी मिळविताना खोटे व बनावट कागदपत्र तसेच कागदोपत्री कर्मचारी दाखवून तपासणी कमिटीला मोठ्या प्रमाणावर लाच देऊन शासनाची फसवणूक करून एकाच इमारतीत वेगवेगळ्या कॉलेजला मंजुरी मिळविलेल्या आहेत.

तसेच विद्यार्थ्यांना फक्त कागदोपत्री प्रवेश देऊन त्यांची शिष्यवृत्ती लाटण्याचा कार्यक्रम चालू आहे. येथे एकही शिक्षक उपलब्ध नसून फक्त कॉलेज तपासणीच्या वेळी कागदोपत्री शिक्षक दाखविले जातात. त्यामुळे डॉ. सूर्यवंशी दाम्पत्यासह चेतना सेवा संस्था लातूरचे सर्व पदाधिकारी व कागदोपत्री काम करणारे सर्व कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करावेत अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. ११ जुलैपासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांनी दिला आहे.



डॉ. सुहास सूर्यवंशी व डॉ. पल्लवी सूर्यवंशी यांनी इंदिरा हॉस्पिटल जामखेड येथे शासनाच्या महात्मा फुले जीवनदायी योजनेत देखील करोडो रुपयांचा घोटाळा केला आहे. त्या भ्रष्टाचाराच्या माध्यमातून गोळा केलेल्या पैशातून साकत येथे चेतना सेवाभावी संस्था लातूर या संस्थेच्या माध्यमातून अवैध संपत्ती घेतली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे एकाच इमारतीत अनेक कॉलेजला मंजुरी घेऊन शासनाची फसवणूक केली आहे.

**– सुनील साळवे, जिल्हाध्यक्ष**

# शिंदेकडून आ. जगताप यांच्या निधीतून भरीव कामे

## संपत बारस्कर; ॲड. युवराज शिंदे यांच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** ॲड. युवराज शिंदे यांनी कल्याण रोड परिसराच्या विकासासाठी चांगले काम उभे केले आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून या परिसरामध्ये मोठा निधी उपलब्ध करून दिला असल्याचे प्रतिपादन संपत बारस्कर यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष ॲड. युवराज शिंदे यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा व स्कूल बॅगचे वाटप गुरुवर्य राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी बारस्कर बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, प्रा. माणिकराव विधाते, माजी नगरसेवक संभाजी लोंढे, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष अभिजीत खोसे, माजी नगरसेवक निखिल वारे, संदीप कर्डिले, सुमित कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहर महिला जिल्हाध्यक्ष रेश्मा आठरे, लक्ष्मण खोडदे, संभाजी चौधरी, चेतन शेलार, आरती लोखंडे, अर्चना परकाळे, किशोर नवकार, काका शेळके, रुपेश लोखंडे, संजय गोसावी, उमेश धोंडे, गणेश दातरंगे, विकास त्रिंबके, शिवाजी शिंदे, राजेंद्र शिंदे, शरद शिंदे, ॲड. संजय शिंदे, विराज शिंदे, यश राठोड, अजय भोसले, शंतनू दुबे पाटील, ॲड. सुरेश लगड, कुंडलिक आरोडे, अरुण ढाकणे, रवी मैड, राजू पाडळे, विवेक खोसे, विराज टाक, महेश सातपुते, गणेश अमराळे आदी उपस्थित होते.

संपत बारस्कर म्हणाले की, आपण समाजामध्ये वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागते या भावनेतून ॲड. युवराज शिंदे हे आपले कर्तव्य पार पाडत असतात कल्याण रोड परिसरामध्ये सामाजिक कामातून नागरिकांना एकत्रित करत समाजाचे प्रश्न मार्गी लावीत असतात, राजकारणाच्या पलीकडे जाऊन ॲड. युवराज शिंदे यांनी कल्याण रोड परिसराच्या विकासासाठी चांगले काम उभे केले आहे. आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून या परिसरामध्ये मोठ्या निधी उपलब्ध करून दिला आहे असे ते म्हणाले.

ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, कल्याण रोड परिसर हा अहिल्यानगर शहराच्या अत्यंत जवळचा भाग म्हणून ओळखला जातो, या भागाच्या विकासासाठी काम करत आहे नागरिकांचे प्रश्न समजावून घेत आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून ते सोडवले जात आहे, समाजाप्रती आपले काहीतरी देणे लागते या भावनेतून सालाबाद प्रमाणे १००० विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले आहे, तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला आहे.

# प्रभावती ढाकणे यांना मातृशोक

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पाथर्डी :** जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या प्रभावती ढाकणे यांना मातृशोक झाला असून त्यांच्या मातुश्री यशोदाबाई सोपानराव चितळे यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी निधन झाले. गेल्या चार वर्षांपासून त्या कॅन्सरशी झुंज देत होत्या. काल पहाटे त्यांचे अहिल्यानगर येथे राहत्या घरी निधन झाले. कणखर व शिस्त स्वभावाच्या म्हणून त्यांची ओळख होती. अत्यंत धार्मिक असलेल्या यशोदाबाई यांनी अनेक वर्ष पंढरपूरची आषाढी एकादशीची पायी वारी केली होती.

# 'मिशन आरंभ'मुळे शाळांच्या पटसंख्येत वाढ

## शिक्षणाधिकारी भास्कर पाटील; पाथर्डीत इयत्ता पाचवीच्या वर्ग शिक्षकांची कार्यशाळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** जिल्हा परिषदेच्या शाळांमधील चौथी आणि पाचवीच्या विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवण्यासाठी 'मिशन आरंभ' हा एक प्रभावी व सार्वजनिक सहभागातून राबविला जाणारा उपक्रम ठरत आहे. या उपक्रमामुळे अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय वाढली असून, या यशस्वी उपक्रमाला सर्व शिक्षकांनी आपले काम पूर्ण केल्यानंतरही अतिरिक्त वेळ देऊन अधिक प्रभावी बनवावे, असे आवाहन जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग व पाथर्डी पंचायत समितीच्या वतीने शिष्यवृत्ती पूर्व उच्च प्राथमिक जिल्हा परिषदेच्या शाळेत इयत्ता पाचवीच्या वर्ग शिक्षकांची कार्यशाळा पाथर्डी येथील श्री तिलोक जैन विद्यालयात आयोजित करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी जिल्हा नोडल अधिकारी जयश्री कार्ले, गट शिक्षणधिकारी शिवाजी कराड, विस्ताराधिकारी तथा तालुका नोडल अधिकारी रामनाथ कराड, अनिल भवार, निलेश क्षिरसागर, प्राचार्य अजय भंडारी, महेंद्र राजगुरू उपस्थित होते.



मिशन आरंभ उपक्रमामागील मूळ उद्दिष्ट म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढवणे. 'मिशन आरंभ'ने हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सकारात्मक दिशा दिली आहे. यामध्ये शिक्षकांचे योगदान अत्यंत मोलाचे असून, त्यांनी केवळ नियमित अध्यापनापुरते न थांबता समाजाशी संवाद साधून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घ्यावा.

**– भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी**

# घुलेवाडीतील फ्लाय ओव्हरचे काम पाडले बंद

## सर्विस रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची नागरिकांनी केली मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील घुलेवाडी शिवारातील स्टेटस हॉटेलजवळ असणाऱ्या सर्विस रस्त्यावरती मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले असताना त्याकडे दुर्लक्ष करून संबंधित ठेकेदार फ्लाय ओव्हरचे काम करत आहे. ते काम परिसरातील नागरिकांनी बंद पाडून सर्विस रस्त्यावरील पडलेले खड्डे त्वरित बुजून दुरुस्ती करा, अशी मागणी केली आहे.



ज्या ज्या ठिकाणी फ्लाय ओव्हरचे काम सुरू आहे, त्याच्या बाजूने जाणाऱ्या-येणाऱ्या रस्त्यांना मोठ मोठे खड्डे पडले असून त्याचा त्रास वाहनांना होत आहे. ही सर्व विकासकामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकावू, आणि निर्धारित वेळेत पूर्ण पूर्ण झाली नाही तर आंदोलन केले जाईल, असा इशारा ग्राहक पंचायतचे विनायक वाडेकर, रोशन कोथमिरे, शाम नाईकवाडी, सीताराम पानसरे, प्रशांत राऊत, सचिन आव्हाड, सोनू रुपवते आदींनी दिला आहे.

**.... त्यामुळे अनेक अपघात!**

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे सध्या रुंदीकरण आणि काँक्रिटीकरण करण्याचे काम सुरू आहे. तसेच अनेक ठिकाणी फ्लाय ओव्हरचे काम सध्या सुरू आहे. त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. रस्त्याचे काम करतांना कोणतीही काळजी घेतली जात नाही. त्यामुळे अनेक अपघात झाले आहेत.

# वडझिरे इंग्लिश स्कूलचा बालदिंडी सोहळा उत्साहात

## 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या गजरात वडझिरे नगरी दुमदुमली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात प्रसिद्ध असलेले वडझिरे इंग्लिश स्कुलच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने काढलेली बालदिंडीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

वडझिरे येथील प्रसिद्ध इंग्लिश स्कुलच्या बाल गोपाळांचा पायी दिंडी सोहळा पाऊण तास चालल्याने ग्रामस्थांना साक्षात पंढरपूरला असल्याचा भास झाला. मुलांची वेशभूषा, पालखी, ढोल, ताशा, टाळ, मृदुंग, पेटी, भजन, गौळण याचे सुमधूर व सुंदर आवाजात गात, जयघोष करत, वाद्यांच्या गजरात व तालात काढण्यात आलेल्या या दिंडीने वडझिरे नगरी अक्षरशः दुमदुमून गेली.




या बाल वारकऱ्यांसोबत प्राचार्य जयसिंग लंके, प्रकाश कवडे, हिलाळ, सोनू उचाळे, विद्या कवडे, वर्षा लंके, संगिता गायकवाड, शर्मिला गाडगे, पोस्ट मास्तर विजय एरंडे व ग्रामस्थांच्या भजन गिताने वातावरण भक्तीमय झाले.

प्राचार्य जयसिंग लंके यांच्या सुसुत्र नियोजनाने वडझिरे इंग्लिश स्कूलने काढलेल्या बाल वारकऱ्यांच्या बालदिंडीचे ग्रामस्थांनी विशेष कौतुक केले.

# 'मुळा'तून ३ हजार क्युसेकने सोडले पाणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** राहुरीच्या मुळा धरणातून बुधवारी पाच वाजता पाणी सोडण्यात आले असल्याची माहिती कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी दिली असून त्यांच्या हस्ते कळ दाबून पाणी सोडण्यात आले. धरणाच्या अकरा दरवाजातून तीन हजार क्युसेकने पाणी सोडण्यात आले. आवश्यकतेनुसार त्यात वाढ करण्यात येईल. नदीकाठच्या लोकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.



२६००० हजार दशलक्ष घनफूट पाणी साठवण क्षमता असलेले मुळा धरणाचा एकुण साठा १८१६१दलघफु (६९.८५) होत असल्यामुळे तसेच धरणात पाणी आवक सुरु असल्याने जलाशय परिचलन सूचीनुसार नदीमध्ये ३००० क्यूसेक एवढा विसर्ग सोडण्यात येणार आहे. पाणलोट क्षेत्रात पाऊस होत असल्यामुळे विसर्गात आवश्यकते नुसार वाढ केली जाणार आहे.

नदी काठच्या लोकांनी सतर्क रहावे व नदी पात्रात प्रवेश करू नये. तसेच कुठलीही जीवित व वित्त हानी होणार नाही या बाबत खबरदारी घ्यावी, असे आवाहन जलसिंचन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

राहुरीत दुसऱ्या दिवशी संततधार पावसाची हजेरी होती. दिवसभर रिमझिम भीज पाऊस पडला. खरीपाच्या पिकांना हा पाऊस अत्यंत उपयुक्त ठरणारा आहे.

# गुरुपौर्णिमानिमित्त खताळांच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त शहरातील पंचायत समिती परिसरातील श्री अश्वेश्वर महादेव हिंदू मंडळ व आ. अमोल खताळ प्रतिष्ठानच्या वतीने शिर्डी येथे साई दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांसाठी आयोजित महाप्रसाद वाटपाच्या कार्यक्रमात नीलम खताळ यांनी सहभागी होत भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले.



गुरु पौर्णिमेनिमित्त दरवर्षी हजारो भाविक शिर्डी येथे पायी दर्शनासाठी जात असतात. हे भाविक शहरातील दिले नाका, पंचायत समिती परिसरातून शिर्डी येथे जात असतात. या भाविकांसाठी पंचायत समिती, दिल्ली नाका परिसरातील श्री अश्वेश्वर महादेव हिंदू तरुण मित्र, आ. अमोल खताळ प्रतिष्ठान यांच्या वतीने महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी नीलम खताळ, पायल ताजणे, शिवम गुंजाळ, विलास घुगे, लालू गुंजाळ, निलेश गाडेकर, दीपक वाघमारे, प्रदीप गुंजाळ, सौरभ गुंजाळ, आदित्य नवले, सागर घुगे, प्रदीप राजपूत, हेमंत गाडेकर, निखिल धुमसे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# चंद्रकला रासने यांची निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सिव्हिल हडको येथील रहिवाशी श्रीमती चंद्रकला प्रकाश रासने (वय ६०) यांचे ८ जुलैला हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रमेश (भाऊ) रासने यांच्या त्या मातोश्री होत.

# मुळे शाळेच्या बाल वारकऱ्यांनी रंगली दिंडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने गुरुदेव दत्त एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीरामपूर येथील कै. अ. दि. मुळे प्राथमिक विद्यालयात बाल दिंडी मोठ्या उत्साहात साजरी झाली. शाळेच्या प्रांगणात विठ्ठल-रखुमाईच्या भक्तीत रंगलेल्या या सोहळ्याने सर्वांचे मन जिंकले. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्या वारकऱ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात आणि विठूनामाच्या जयघोषात दिंडी काढली, ज्याने अवघा परिसर भक्तिमय झाला.



शाळेत मुख्याध्यापिका जे. पी. देठे यांच्या हस्ते विठ्ठलाच्या पालखीचे विधिवत पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार वेशभूषा केली होती. मुलांनी संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, यांच्या वेशभूषेसह विठोबा आणि रखुमाईच्या रूपात सजलेले विद्यार्थी विशेष आकर्षण ठरले. मुलींनी नऊवारी साडी, डोक्यावर तुळशी वृंदावन आणि केसात गजरा घालून तर मुलांनी टोपी, गळ्यात टाळ आणि कपाळी गंध लावून दिंडीत सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका ताजने यांनी तर नियोजन अमृता अकोलकर यांनी केले.

# थकीत ऊस बिलासाठी २० जुलैला उपोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** तालुक्यातील दिघी येथील शेतकरी लक्ष्मीबाई केशव नागोडे, संजय केशव नागोडे आणि मच्छिंद्र रावसाहेब गवळी यांनी २०२४ मध्ये कुकडी सहकारी साखर कारखान्याला पुरविलेल्या ऊसाचे उर्वरित थकीत पैसे अद्याप न मिळाल्याने शेतकरी महिलेसह दोघांनी नेवासा तहसील कार्यालयासमोर दि. २० जुलैपासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

या शेतकऱ्यांनी ऊस पुरवठ्यानंतर केवळ प्रतिटन २२०० रुपये एवढेच प्राथमिक पैसे मिळाले. त्यानंतर कोणतेही उर्वरित पेमेंट कारखान्याने दिलेले नाही. सध्या आर्थिक अडचणीत असलेल्या या शेतकऱ्यांनी कारखान्याच्या व्यवस्थापनाकडे अनेक वेळा थकीत बिलांसाठी पाठपुरावा केला, मात्र त्याकडे सातत्याने दुर्लक्षच करण्यात आले.या पार्श्वभूमीवर त्यांनी काल प्रादेशिक सहसंचालक साखर, अहमदनगर यांच्या कार्यालयात निवेदन देवून, आपली थकीत बिले लवकर मिळावीत, अशी मागणी केली. तरीदेखील कारवाई होत नसल्याने त्यांनी आता थेट तहसील कार्यालयासमोर आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. जोपर्यंत आम्हाला थकीत पेमेंट मिळत नाही तोपर्यंत हे आंदोलन मागे घेणार नाही.

# गुरुपौर्णिमेनिमित्त डॉ. थोरातांचा पायी दिंडीत सहभाग

## संगमनेर-शिर्डी पायी दिंडीतील साई भक्तांची विविध ठिकाणी सेवा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** जगप्रसिद्ध देवस्थान असलेल्या श्री. साईबाबांच्या शिर्डी येथे गुरुपौर्णिमेचा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा होतो. या उत्सवासाठी राज्यासह देशभरातील भाविक मोठ्या संख्येने येत असून डॉ. जयश्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्यातील युवक व महिलांनी पायी दिंडीत सहभाग घेऊन साई भक्तांची सेवा केली आहे.

संगमनेर ते शिर्डी दरम्यान तालुक्यातील युवकांनी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने पायी दिंडी काढण्यात आली. या दिंडीमध्ये कॅन्सरतज्ञ डॉ. थोरात यांनी पायी चालत साई भजन गात सहभाग घेतला. पुणे पश्चिम महाराष्ट्र,कोकण आणि मुंबई विभागातून अनेक दिंड्या संगमनेर मार्गे येत असून या दिंड्यांच्या समवेत युवक व महिला कार्यकर्त्यांनी पायी दिंडी काढली. याचबरोबर डॉ. थोरात यांनी या दिंडीमध्ये सहभाग घेत विविध साई भक्तांना प्रसाद वाटप, आरोग्य तपासणी यांसह विविध व्यवस्थांमध्ये सहभाग घेतला.



दिंडीमध्ये सर्व लोक एकत्र मिळून मिसळून गुण्यागोविंदाने साई भजन गात असतात. पायी दिंडी ही महाराष्ट्राची मोठी संस्कृती असून यामध्ये भेदभाव नसतो. सर्व धर्म समभाव जपत सर्वजण एकमेकांना माऊली म्हणून हाक मारतात. आषाढी श्रावणाच्या सरी, रिमझिम पाऊस, सर्वत्र हिरवाई आणि साईनामाचा गजर असा हा सुंदर सोहळा जीवनातील अविस्मरणीय ठेवा असल्याचे त्या म्हणाल्या.

यावेळी विविध ठिकाणी त्यांनी साई भक्तांना खिचडी व प्रसादाचे वाटप केले याचबरोबर अनेकांचे आरोग्य तपासणी केली. संगमनेरमधील युवक, महिला आणि अनेक पदाधिकाऱ्यांनी या दिंडीमध्ये सहभाग घेऊन शिर्डीतील उत्सवात येणाऱ्या साई भक्तांची सेवा केली आहे.

श्रद्धा आणि सबुरीचे प्रतीक असलेले साईबाबा हे सर्वांचे श्रद्धास्थान आहे. संगमनेर तालुक्यासह राज्यभरातील लाखो भक्तांची साईबाबांवर मोठी श्रद्धा असून गुरुपौर्णिमानिमित्त तीन दिवस शिर्डीमध्ये मोठा उत्सव असतो यासाठी राज्यभरातून लाखो साईभक्त येत असतात. संगमनेर वरून अनेक साई भक्त येत असताना माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी या भक्तांना विविध सुविधा दिल्या जातात.

**– डॉ. जयश्री थोरात**

## प्राजक्ता गुळवे सीए परीक्षेत उत्तीर्ण

**जनता आवाज वृत्तसेवा**



**जामखेड** : खर्डा येथील उद्योजक बाळासाहेब गुळवे यांची कन्या प्राजक्ता गुळवे हिने सीए परीक्षेत उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे. प्राजक्ता गुळवे हिचे प्राथमिक व दहावीपर्यंतचे शिक्षण खर्डा येथे झाले. पुढे अकरावी, बारावी शिक्षण हे बारामती येथे झाले असून पुढील बी. कॉम. या शिक्षणासाठी पुणे येथे अॅडमिशन घेतले होते. बी. कॉम.चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तीने सीए परीक्षेचा अभ्यास करून प्रचंड मेहनत घेतली व मे २०२५ रोजी झालेल्या सीए परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. त्यावेळी प्राजक्ताने सर्वात कठीण असलेल्या सीए परीक्षेत उत्तम गुण घेऊन उत्तीर्ण झाली. प्राजक्ता गुळवे ही खर्ड्याचे माजी सरपंच शिवकुमार गुळवे यांची पुतणी असून तिच्या या यशाबद्दल तिचे खर्डा प्रेस क्लब तसेच खर्डा व परिसरातून अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

## श्रीरामपुरात अपंगांना मिळणार साहित्य

श्रीरामपूर – जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र अहिल्यानगर, मूकबधिर विद्यालय श्रीरामपूर, अपंग सामाजिक विकास संस्था श्रीरामपूर आणि आसान दिव्यांग संघटना महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ११ जुलै रोजी सकाळी ठीक १० वाजता मूकबधिर विद्यालय, गायत्री मंदिराजवळ, अशोक टॉकीज समोर, बेलापूर रोड या ठिकाणी दिव्यांग कृत्रिम हातपाय व कॅलिपर्स मोजमाप व मोफत वितरण शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे. अशी माहिती प्रमुख संयोजक मूकबधिर विद्यालयाचे वैद्यकीय सामाजिक अधिकारी संजय साळवे व मुख्याध्यापक संतोष जोशी यांनी दिली आहे. प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील, तहसीलदार मिलिंद कुमार वाघ, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, सचिव रोटरी एज्युकेशन ट्रस्ट नारायण भाई पटेल यांच्या उपस्थितीत सदर शिबिरामध्ये अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हातपाय व कॅलिपर्स मोजमाप घेऊन तात्काळ मोफत वितरण करण्यात येणार आहे. तरी अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तीनी सदर शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रशांत गायकवाड, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे संचालक डॉ. अभिजीत दिवटे, प्रकल्प समन्वयक डॉ. दीपक अनाप, रोटरी एज्युकेशन ट्रस्टचे चेअरमन सुरेश बनकर, सचिव नारायणभाई पटेल, खजिनदार विनोद पाटणी, अपंग सामाजिक विकास संस्थेच्या सचिव वर्षा गायकवाड आदींनी केले आहे.

## संगमनेरात रविवारी कृत्रिम अवयव शिबिर

संगमनेर : जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने महायुतीच्या वतीने शहर आणि तालुक्यातील दिव्यांग व्यक्तीसाठी मोफत कृत्रिम अवयव शिबीराचे रविवार दि.१३ जुलै रोजी आयोजित करण्यात आले असल्याची माहिती आ. अमोल खताळ यांनी दिली.केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन आणि दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबीराचे आयोजन करण्यात आले असून, या शिबीराच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम हात व पाय बसवणे, कॅलिपर्स यांचे मोजमाप जागेवरच साहित्य वाटपाचे नियोजन या शिबीराच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे आ. खताळ यांनी सांगितले. हे शिबीर गणेशनगर येथील नगर पालिकेच्या योगाभवन सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आयोजीत करण्यात आले असून, या शिबीरासाठी येताना दिव्यांग व्यक्तींनी आधार्ड, युडी आयडी कार्ड, रेशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला सत्यप्रत व छायांकित प्रत सोबत आणणे गरजेचे असून, दिव्यांग व्यक्तींनी सोबत येताना नातेवाईकांना सोबत घेवून येण्याचे सांगण्यात आले आहे.यापूर्वी राष्ट्रीय वयोश्री योजनेच्या माध्यमातून शहर आणि तालुक्यातील वयोवृद्ध नागरीकांना मोफत साहित्य वाटप करण्यात आले होते. केंद्र सरकारच्या योजनेचा लाभ दिव्यांग व्यक्तींनाही व्हावा, यासाठी हे शिबीर संपन्न होत आहे. पात्र दिव्यांग व्यक्तींनी या मोफत शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रशांत गायकवाड, जिल्हा दिव्यांग पुनर्वर्सन केंद्राचे संचालक डॉ. अभिजीत दिवटे, प्रकल्प समन्वयक डॉ. दिपक अनाप, डॉ. अभिजीत मिरीकर यांनी केले आहे.

# जामखेड तालुक्यात चढ्या दराने खतांची विक्री

## तालुक्यात ६० हजार हेक्टरवर खरिपाची पेरणी झाली पूर्ण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेड तालुक्यात ६० हजार हेक्टरवर खरिपाची पेरणी झाली आहे. आता ही पिके चांगलीच बहरली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांकडून रासायनिक खतांचा मारा केला जात आहे. या संधीचा फायदा घेत कृषी केंद्रचालकांकडून युरिया खत नसल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, शेतकऱ्यांनी अधिक दराने खरेदी केल्यास खत उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना नाहक आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

सध्या बाजारात युरियाची एक गोणी २६६ रुपयांप्रमाणे विक्री करावी, असा शासनाचा आदेश आहे; परंतु काही दुकानदार शिलकीचे पैसे घेऊन पावतीवर २६६ रुपये किंमत टाकत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. जामखेड तालुक्यातील काही गावांत युरिया, डीएपीचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाला आहे. बाजारपेठेत युरिया मिळत नसल्याने शेतकऱ्यांची उभी पिके धोक्यात आली आहेत. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. यंदा खतांच्या किमती वाढल्या आहेत.



> सध्या जामखेड तालुक्यात संरक्षित युरियाचा साठा विक्रीसाठी खुला करण्याची परवानगी वरिष्ठ कार्यालयाकडून मिळाली आहे. तरी युरियाची टंचाई भासणार नाही. तसेच अतिरिक्त साठ्याची मागणीसुद्धा करण्यात आली आहे. दुकानदार युरिया देत नसतील तर संबंधित शेतकऱ्यांनी कृषी विभागाशी संपर्क साधावा,
>
> **-रवींद्र घुले, तालुका कृषी अधिकारी, जामखेड**

जामखेड तालुक्यात खतांची टंचाई भासत असताना काही दुकानदारांनी शेतकऱ्यांना नवीन अडचणीत टाकले आहे. युरिया खत हवे असल्यास त्याबरोबर डीएपी, पोटॅश किंवा मायक्रो न्यूट्रिएंट खतेही घेण्याची सक्ती काही ठिकाणी केली जाते. शासन नियमानुसार कोणतेही खत शेतकऱ्याला स्वतंत्रपणे घ्यायचे स्वातंत्र्य आहे. मात्र, काही कृषी केंद्र चालक युरिया देण्यासाठी इतर खते घेण्याची अट घालीत असल्याचे चित्र आहे.

जामखेड तालुक्यातील जवळा, नान्नज, हळगाव, खर्डा आदी गावांमधून युरिया खतांचा तुटवडा असल्याच्या तक्रारी आहेत. काही ठिकाणी दुकानदार खत नाही, असे सांगत असून अधिक पैसे दिल्यास लगेच उपलब्ध करून दिले जात आहे. शासन दर २६६ असतानाही प्रत्यक्ष विक्री ३००-३५० रुपये घेतले जातात. पावतीवर मात्र शासन दरच दाखवून शिलकीच्या नावाखाली अतिरिक्त रक्कम घेतली जाते.

## मद्याच्या किमतीत केली भरमसाठ वाढ

### जिल्ह्यात परमिटरूम चालकांचा आंदोलनाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : राज्य शासनाने मद्याच्या किमतीत केलेली दरवाढ व अतिरिक्त वॅट रद्द करावा, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा श्रीरामपूर तालुका परमिट रूम व वाईनशॉप ओनर्स सोशल असोसिएशनचे अध्यक्ष नाना जोंधळे यांनी दिला आहे.

संघटनेच्या बैठकीत बोलताना त्यांनी हा इशारा दिला. नाना जोंधळे म्हणाले, लाडकी बहीण योजनेसाठी सरकारकडे पैसे नाहीत. त्याचा भार परमिट रूमधारकांवर सरकार टाकीत आहे. यासाठी अतिरिक्त कर आकारणी लादली आहे. राज्यातील हॉटेल, परमिट रूम व वाईनशॉप व्यावसायिकांसाठी एकच कर प्रणाली



असावी. तसे न करता राज्य सरकारने ती परमिट रूमवर केली आहे. ही अन्यायकारक करवाढ मागे घ्यावी, अन्यथा जिल्ह्यातील सर्व परमिट रूम चालक व मालक रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन करतील.

राज्यातील मद्य उद्योग आर्थिक संकटात आहे. हॉटेल व्यवसायाला कोणतीही सवलत किंवा मदत दिली जात नाही. त्याचा परिणाम ग्राहक आणि हॉटेल व्यावसायिकांवर झाला आहे. हॉटेल व परिमिट रुमवरील मद्यविक्रीवर अतिरिक्त व्हॅट लावल्याने अनधिकृत व बेकायदेशीर दारुविक्रीत वाढ झाली आहे. परवाना नसणाऱ्या हॉटेल्स, धाब्यामधून सर्रास विक्री केली जात आहे. यामुळे व्यवसाय मोडकळीस येण्याची स्थिती उद्भवल्याचे श्री. जोंधळे यांनी सांगितले.राज्य शासनाने मद्याच्या किमतीत केलेली दरवाढ व अतिरिक्त वॅट रद्द करावा. राज्यातील हॉटेल, परमिट रूम व वाईनशॉप व्यावसायिकांसाठी एकच कर प्रणाली असावी. लाडकी बहीण योजनेसाठी सरकारकडे पैसे नाहीत. त्याचा भार परमिट रूमधारकांवर सरकार टाकीत आहे. यासाठी अतिरिक्त कर आकारणी लादली आहे.

## प्रवरा कृषीच्या तीन विद्यार्थ्यांची निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषि शास्त्र संस्था अंतर्गत असणाऱ्या कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील रोहन रसाळ, अश्विनी गुडेकर आणि गौरव शिंदे यांची पदव्युत्तर शिक्षणासाठी भारतातील नामांकित आय. आय. आय. टी संस्थेमध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निलेश दळे यांनी दिली.संपूर्ण भारतामधून पदव्युत्तर शिक्षणासाठी गेट, गेट-बी यासारख्या परीक्षा घेतल्या जातात. यामध्ये कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी रोहन रसाळ आणि अश्विनी गुडेकर यांची इंद्रप्रस्था इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नवी दिल्ली येथे कंप्युटेशनल बायोलॉजी या विषयात तर गौरव शिंदे याची इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अलाहाबाद येथे बायोइन्फॉर्मेटिक्स या विषयात पदव्युत्तर शिक्षणासाठी निवड झाली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालिनीताई विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, सल सचिव भारत घोगरे आदींनी अभिनंदन केले आहे.

## स्कीममुळे नागरिकांचे पैसे बुडाल्याची घटना दुर्दैवी

### डॉ. सुजय विखे पाटील; एजंटगिरीवर कारवाई करण्याच्या पोलिसांना सूचना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : शिर्डीमधून साडेतीनशे कोटीची गुंतवणूक ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट कंपनीसाठी केली जाते. हे माझ्यासाठी आश्चर्याची गोष्ट असून यामध्ये जवळपास अकराशे नागरिकांनी आपले पैसे गुंतवल्याचे समजते. त्यात ७० टक्के साई संस्थानमधील कर्मचारी आहेत. त्यापैकी ४ कायमस्वरूपी सेवेत असलेल्या संस्थांच्या कर्मचाऱ्यांनी या कंपनीत पैशाची गुंतवणूक करण्यासाठी एजंटगिरी केल्याचे समजते. ज्या कोणी या प्रकरणात एजंटगिरी तसेच या पैशाच्या माध्यमातून सावकारकी केली, अशा लोकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या जातील. झटपट मार्गाने पैसे कमवण्याच्या अनेक स्कीममुळे नागरिकांचे पैसे बुडीत गेल्याच्या घटना निदर्शनात येऊन देखील नागरिक अशा स्कीममध्ये आपले पैसे गुंतवणतात, ही दुर्दैवी बाब असल्याची प्रतिक्रिया डॉ. सुजय विखे पाटील यांनी शिर्डीतील ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट कंपनीच्या माध्यमातून



शिर्डी परिसरातील जवळपास साडेतीनशे कोटींची झालेल्या घोटाळ्याबाबत बोलताना प्रतिक्रिया दिली.

डॉ. विखे पाटील म्हणाले, गरिबांची पैसे मिळाले पाहिजे. ही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भूमिका आहे .त्यासाठी आपण प्रयत्न करणार असून परंतु हे पैसे मिळणे अत्यंत कठीण असून यासाठी खूप काळ जाईल, लवकर तोडगा निघेल असे नाही. परंतु ज्या नागरिकांचे यात पैसे गेले, त्यांच्या भावना मी समजू शकतो. यात सुदैवाने राजकीय व्यक्ती म्हणून आमचा काही सहभाग नाही आणि नव्हता. तरी देखील नागरिकांनी त्यांचे पैसे परस्पर गुंतवले त्यांना कोणी बळजबरी केली नव्हती. आपण जेव्हा निर्णय घेतो त्या निर्णयाचा फायदा होईल किंवा तोटा याचा विचार करायला हवा. यात ज्यांनी पैसे गुंतवले. त्यांचा सुरुवातीला फायदा झाला अनेकांनी बंगले व गाड्या घेतल्या. ही स्कीम अशीच आहे की, सुरुवातीला ही एवढी भावते की आपण पाचच्या जागेवर दहा रुपये गुंतवायला लागतो आणि नंतर त्यात अडकले जातो आणि हेच शिर्डी बाबतीत घडले, दुर्दैवी आहे. आमच्या संवेदना सर्व गुंतवणूकदारांबरोबर आहोत. आम्ही त्यांच्या कठीण काळात त्यांच्याबरोबर आहोत. जेवढे प्रशासकीय बळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून लावता येईल. त्यासाठी आम्ही प्रयत्न करू.

> ज्यांनी या पैशातून सावकारकी केली, त्यांच्यावर देखील कारवाई होणार आहे. दहा दिवसात त्यांच्यावर कारवाई होताना दिसेल. ही रॅकेट खूप मोठी आहे. ही गोष्ट फक्त नंदुरबार पुरती मर्यादित नसून एकमेकांवर विश्वास ठेवून अनेकांनी यात पैसे गुंतवले. यातून एकच गोष्ट घेण्यासारखी आहे की, आपण आपल्या कामातून मिळालेल्या पैशातच समाधानी राहिली पाहिजे. नाहीतर वेगळ्या मार्गाने पैसे कमवायच्या नादात आपले आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होते. हे या गोष्टीतून सिद्ध झाले आहे. **– डॉ. सुजय विखे पाटील**



**शिर्डी : गुरुपौर्णिमेनिमित्त जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सौ शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील तसेच रणरागिनी महिला मंडळाचे अध्यक्ष सौ धनश्री ताई विखे पाटील यांनी शिर्डी येथे श्री साईंचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी मुख्याधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य अधिकारी भीमराव दराडे आदी उपस्थित होते.**

## ५०० विद्यार्थ्यांची केली रक्तगट तपासणी; दादा वामन जोशी नवीन मराठी शाळेतील उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : दादा वामन जोशी नवीन मराठी शाळेत महिला मंडळ श्रीरामपूर यांच्यावतीने रक्तगट तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. शैक्षणिक कामासाठी तसेच आपत्कालीन वेळी शिक्षक व पालकांना विद्यार्थ्यांचा रक्तगट माहीत असणे आवश्यक आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महिला मंडळ श्रीरामपूर यांच्यावतीने सुमारे



५०० विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली.

या कामी डॉ.अर्चना सोमानी व त्यांच्या संपूर्ण टीमचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना रक्तगट माहीत असण्याचे फायदे यावेळी सांगण्यात आले. यावेळी महिला मंडळाच्या प्रमुख विश्वस्त शैलजा वाघमारे, विश्वस्त अनिता जोशी, ज्येष्ठ सल्लागार डॉ. अंजली आगाशे, अध्यक्षा शितल मुथा, उपाध्यक्ष रमा पोफळे, सचिव प्रीती आगाशे, सहसचिव स्मिता जोशी, खजिनदार राणी बाबेल, अस्मिता कुलकर्णी, साधना चुडीवाल, नीता जगताप, सुनिता मांडण, अनघा देशपांडे, नलिनी देशपांडे उपस्थित होत्या.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे चेअरमन ऋषिकेश जोशी, प्रभारी मुख्याध्यापक भरत शेंगाळ, मीना जायभाये, स्मिता गोरे, भाग्येश ठाणगे, अनिल गिरमे, मंगल वाघ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विजय दवणे यांनी सूत्रसंचालन केले तर अशोक परदेशी यांनी आभार मानले.

# अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये खरिपाची ७२ टक्के पेरणी

## कापसावर मावा व तुडतुड्याचा रोगाचा.. तर मक्यावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर-** गेल्या तीन दिवसांपासून जिल्ह्यातील काही भागात भुरभुर तर काही भागात संततधार पाऊस सुरू असल्याने खरीप पिकांची वाढ आता जोमाने होत आहे. या महिन्यात आतापर्यंत जिल्ह्यात २१.५ मिलीमीटर पाऊसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात आजअखेर ७२.९ टक्के खरीपाची पेरणी झाली आहे. सध्या पिके वाढीच्या अवस्थेत असून सर्वसाधारण रोपांची ४ ते ६ इंचापर्यंत वाढ झालेली आहे. दरम्यान, कापसावर मावा व तुडतुड्या तर मका पिकावर लष्करी आळीचा प्रादुर्भाव दिसून आला आहे.

मे महिन्यात झालेल्या अवकाळीमुळे यंदा पेरणीला विलंब झाला. दरम्यान, ७ जूननंतर पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. पेरणीनंतर रोपांना पावसाची गरज होती. परंतू पिके सुकू लागली होती. मात्र गेल्या तीन ते चार दिवसांपासून पावसाने हजेरी लावली आहे. काही भागात संततधार तर काही भागात अधून मधून भुरभुर पावसाच्या सरी कोसळत आहे. त्यामुळे पिकांच्या वाढीसाठी हा पाऊस उपयुक्त ठरला आहे.

अकोले तालुक्यात रोपवाटिका प्रक्षेत्रावर २२३० हेक्टर क्षेत्रावर भात रोप तयार करण्यात आली आहेत. तर भात पिकांचे सरासरी क्षेत्र १८ हजार ७४० हेक्टर असून आतपर्यंत ६०५० हेक्टर क्षेत्रावर



लागवड झाली आहे. बाजरी-८९ हजार ६२० हेक्टरपैकी ५० हजार ६३६ हेक्टरवर पेरणी झाली आहे. तूर- ६४ हजार ५८४ हेक्टर पैकी ५८ हजार ८८१ हेक्टर म्हणजे ९१ टक्के पेरणी झाली. मुग ५१ हजार ९८० हेक्टर पैकी ४६ हजार ५४० हेक्टर म्हणजे ८९ टक्के पेरणी झाली. उडीद ६७ हजार ५९५ हेक्टरपैकी ६२ हजार १९५ अशी ९२ टक्के पेरणी, सुर्यफुल २१७ हेक्टर पैकी ४३ हेक्टर १९ टक्के पेरणी, भुईमुग ६ हजार ५९९ हेक्टरपैकी ३ हजार ४५३ हेक्टर म्हणजे ५२ टक्के पेरणी, सोयाबीन १ लाख ७८ हजार ५०५ हेक्टरपैकी १ लाख ५६ हजार १४४ हेक्टर म्हणजे ८७ टक्के तर कापुस १ लाख ५५ हजार ३२८ पैकी १ लाख २१ हजार ७१२ हेक्टर म्हणजे ७८ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली. कापुस पिकावर मावा व तुडतुडेचा प्रार्दुभाव झाला. तर मकावर लष्करी आळीचा प्रादुर्भाव आढळून आला. उपायायोजना करण्याच्या सुचना कृषी विभागाने केल्या आहेत.

> यंदाच्या खरीपा हंगामासाठी ७ लाख १६ हजार २०८.६ हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्यात आले असून त्यापैकी आतापर्यंत ५ लाख ९४ हजार ७६९.१९ हेक्टर क्षेत्रावर खरीप हंगामातील विविध पिकांची पेरणी झाली आहे. यावेळी मका पिकाचे क्षेत्र वाढले आहे. कृषी विभागाने ७७ हजार ९९९ हेक्टर क्षेत्राचे नियोजन केले होते. मात्र आतापर्यंत ८५ हजार ७९८.२१ हेक्टर क्षेत्रावर मका पिकाची पेरणी झाली आहे. म्हणजे ११० टक्के क्षेत्र झाले आहे.

# अस्मिता

## कपाटात जागा करा


टापटीप

कोणत्याही विशेष प्रसंगी घालण्यासाठी आपल्याकडे काहीही नाही, हे वाक्य अनेकींच्या तोंडून ऐकायला मिळते आणि आपणही अनेकदा ते उच्चारतो. पण कधीतरी शांतपणे असे का घडते, याचाही विचार करा. असे घडते कारण आमचे कपाट कायमच कपड्यांनी ओसंडून वाहत असते. खरे पाहता त्यातील बरेच कपडे आपण क्वचितच वापरतो. त्यामुळे ते फक्त जागा व्यापतात आणि कपाटातील गर्दी वाढवतात. कामाच्या धबडग्यात आपण जुने आणि वापरात नसणारे कपडे कधीच कपाटाबाहेर काढत नाही. म्हणूनच वरील समस्या सोडवण्यासाठी आधी कपाटातून किमान तीन प्रकारचे कपडे ताबडतोब काढून टाका आणि कामाच्या कपड्यांसाठी जागा तयार करा.



✽ सर्वप्रथम तुम्हाला न आवडणारे कपडे काढा तसेच जुने कपडेही बाजूला काढा कारण ते फारसे वापरलेही जात नाहीत आणि अंगावर चांगलेही दिसत नाहीत. असे कपडे घातले की तुम्ही स्वत:वर नाराज असता. त्यामुळेच कपाट या अनावश्यक कपड्यांनी भरलेले ठेवू नका.

✽ दुसरे म्हणजे तुमच्या जीवनशैलीत न बसणारे कपडे काढा. कधीकधी आपण ट्रेंडच्या मागे धावत अनावश्यक खरेदी करतो. पण असे कपडे अंगावर चांगले दिसतातच असे नाही. त्यामुळेच ट्रेंडिंग आहे म्हणून आंधळेपणाने तो फॉलो करणे मूर्खपणाचे आहे, हे लक्षात घ्या. तुमच्या शरीराचा आकार, दिनचर्या आणि जीवनशैलीशी मिळतेजुळते कपडे निवडा कारण त्यातच तुम्ही स्मार्ट आणि सुंदर दिसाल.



✽ तिसरी बाब म्हणजे ट्रेंडबरोबरच छंद म्हणूनही आपण कपडे खरेदी करतो किंवा कोणीतरी आपल्याला ते भेट म्हणून देतात. खरे तर आपण ते कधीही घालत नाही. आवडीचे नसणाऱ्या, मापात नसणाऱ्या कपड्यांमध्ये तुम्हाला अस्वस्थ वाटते. ते परिधान केल्यानंतर कोणाच्या समोर जाण्यास मोकळेपणा वाटत नाही. फॅब्रिकचा दर्जा, त्यावरील डिझाईन किंवा आरसे, मणी यामुळे तुम्हाला ते परिधान करणे अयोग्य वाटते. असे सवयीचे नसणारे कपडे तुमचा आत्मविश्वास कमी करु शकतात. म्हणून तेदेखील कपाटातून त्वरित दूर करा. यामुळे अनावश्यक भार कमी होईल आणि योग्य तसेच आकर्षक कपड्यांसाठी कपाटात जागा तयार होईल.

## राजकारणात बन्सुरीचा नाद

मानिनी



राजकारणात अनेक स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला असला तरी हा स्त्रियांचा प्रांत नसल्याचे मानणारा एक मोठा वर्ग पाहायला मिळतो. दुसरीकडे आजही या क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत महिलांची मोजकी संख्या बघायला मिळते. म्हणूनच नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये बन्सुरी स्वराज यांनी मिळवलेला विजय तसेच मातेचा पुढे चालवलेला वारसा, हे विषय महत्त्वाचे ठरतात. त्यामुळेच या मानिनीचा यशोवेध घ्यायला हवा.

नवी दिल्ली मतदारसंघात भाजपच्या बन्सुरी स्वराज यांनी मोठा विजय मिळवला. खरे तर नाव जाहीर झाल्यापासूनच माजी केंद्रीय मंत्री सुषमा स्वराज यांच्या या कन्येच्या आसनावर सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या. बन्सुरी स्वराज व्यवसायाने वकील आहेत. त्यांनी इंग्लंडच्या वॉरविक विद्यापीठातून इंग्रजी साहित्यात पदवी प्राप्त केली आहे. याशिवाय लंडनच्या बीपीपी लॉ स्कूलमधून त्यांनी कायद्याची पदवीही घेतली आहे.

गेल्या वर्षी बन्सुरी यांची भाजपच्या दिल्ली राज्य कायदेशीर सेलचे राज्य सहसंयोजक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र लोकसभेचे तिकीट मिळाल्यावर त्यांना मोठा विरोध झाला होता. बन्सुरी स्वराज यांचे नाव पुढे आल्यानंतर दिल्लीतील आप नेते आतिशी यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आणि भाजपला उमेदवार बदलण्यास सांगितले. देशहिताच्या विरोधात वारंवार न्यायालयात उभे राहून देशाच्या विरोधकांची बाजू मांडणाऱ्या अशा उमेदवाराला भाजपने तिकीट दिल्याचे काहींचे म्हणाले होते. वास्तविक, सुषमा स्वराज यांच्या या मुलीने स्थावर मालमत्ता, करार आणि कर इत्यादींशी संबंधित अनेक गुन्हेगारी प्रकरणांमध्ये योगदान दिले आहे. खेरीज पक्षाचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. त्यामुळे या विरोधाकडे लक्ष न देता त्यांना उमेदवारी देण्यात आली.

दिल्लीतील जनता आम आदमी पक्षाच्या भ्रष्टाचारामुळे त्रस्त असून आपल्याला निवडून दिल्यास संसदेत हा मुद्दा जोरदारपणे मांडू, असे त्यांनी प्रचारादरम्यान सांगितले होते. खेरीज प्रचारादरम्यान त्यांनी आईची मूल्ये आपल्या जगण्याचा एक भाग असल्याचेही सांगितले होते. आजही अनेकांना बन्सुरीमध्ये सुषमाजींची झलक दिसते. २०१९ मध्ये सुषमा स्वराज यांच्या निधनानंतर बन्सुरी यांनीच त्यांच्यावर अंत्यसंस्कार करुन स्वभावातील धीरोदात्तपणा दाखवून दिला होता. त्यावेळी त्यांच्या धाडसाचे खूप कौतुकही झाले होते. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले होते की, आईकडूनच मी निर्भय राहायला शिकले आहे. खेरीज आपल्यातील सर्वोत्तम द्यावे आणि बाकीचे सर्व देवावर सोडावे. यामुळे तुमचे जीवन सोपे होते... ही आईची शिकवण त्यांनी मीडियासमोर सांगितली.

आईप्रमाणेच उत्तम लोकप्रतिनिधी होऊन विकासाचे, सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाण्याचे आपले धोरण असेल, असे त्या सांगतात. सुषमाजींनी पहिली लोकसभा निवडणूक लढवली तेव्हाही लढत वकील विरुद्ध वकील अशीच होती आणि बन्सुरीजी लोकसभा निवडणुक लढवत असताना वकील विरुद्ध वकील असाच संघर्ष पाहायला मिळाला. हा योगायोग लक्षात घेता आता त्या मिळालेल्या संधीचे सोने करतील अशी अपेक्षा बाळगू या आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊ या.

## ब्रेस्ट फिडींगची समस्या?

पॅरेंटिंग



आई होणं ही जगातली सर्वात सौभाग्याची घटना असते. मुलाचा जन्म कोणत्याही स्त्रीला अंतर्बाह्य बदलत असतं. पण बाळंतपणानंतर पुन्हा ऑफिस किंवा करीअर जॉईन करत असाल तर सगळ्यात महत्त्वाची समस्या राहते ती ब्रेस्ट फिडींगची. परदेशात कामाच्या ठिकाणी ब्रेस्ट फीड साठवून ठेवण्यासाठी विशेष रेफ्रिजरेटरची सोय उपलब्ध असते. भारतात काही ठिकाणी ही व्यवस्था उपलब्ध असेलही. पण अजूनही काही ठिकाणी अशी सोय उपलब्ध नाही अशा वेळी कामाच्या वेळी बाळाला दूध कसं पाजाल याविषयी...

✽ ब्रेस्ट पंपची मदत घ्या– आजकाल ब्रेस्ट कॉंप्रेसर किंवा ब्रेस्टपंप मिळतो. याद्वारे दूध काढून फ्रीजमध्ये साठवणं शक्य आहे. ब्रेस्ट पंपामार्फत दूध काढणं हा एक उत्तम पर्याय आहे. अनेकदा हातांनी दूध काढलं जातं. पण यामुळे जंतूसंसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो ब्रेस्टपंपच्या सहाय्याने दूध काढावं. पण एका ब्रेस्टपंपचा वापर विशिष्ट मर्यादेपलीकडे करू नये. काही काळानंतर नवीन ब्रेस्ट पंप वापरावा.

✽ ब्रेस्ट पंपने दूध काढणं शक्य नसेल तर हातानेही काढता येईल. ब्रेस्टच्या आसपास असलेल्या पुरळांवर दाब दिल्यास दूध काढणं सुलभ होऊन जातं. हे दूध स्टील किंवा काचेच्या बाटलीमध्ये साठवता येईल. प्लॅस्टीकच्या बाटलीमध्ये ते साठवू नये.

✽ दूध फ्रीजमध्ये ठेवताना २५ डिग्री तापमान असेल याची काळजी घ्यावी. या दुधात पाणी मिसळणार नाही याची काळजी घ्या. साठवलेलं ब्रेस्ट मिल्क बाळाला देण्याआधी थेट गरम करू नका. गरम पाण्यात दूधाचं भांडं ठेवा. थोडसं कोमट झालं की ते बाळाला द्या.

## पोषणासाठी योग्य फेशियल

ब्युटी मंत्रा

त्वचेचं आरोग्य आणि सौंदर्य चांगलं रहावं यासाठी फेशियल केलं जातं. स्त्री आणि पुरुषांच्या त्वचेच्या गरजा वेगळ्या असतात. त्यानुसार फेशियलही केलं जातं. पण तुम्हाला माहीत आहे का, असेही काही फेशियल आहेत जे स्त्री आणि पुरुष या दोघांसाठीही उपयुक्त आहेत. तुम्ही आणि तुमचा पार्टनर अशा फेशियलचा आनंद घेऊन त्वचेला चार चांद लावू शकता. जाणून घेऊ अशा फेशियलसंबंधी...

✽ **हायड्रेटिंग फेशियल–** धावपळीच्या आयुष्यात स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही त्वचेला पुरेसं पोषण मिळत नाही. त्यामुळे त्वचा मोठ्या प्रमाणावर डिहायड्रेट होत असते. अशा वेळी हायड्रेटिंग फेशियल दोघांसाठीही उपयुक्त ठरतं.



✽ **ॲक्ने कंट्रोल फेशियल–** ॲक्नेची समस्या कोणत्याही वयात सतावू शकते. अशा वेळी फेशियलद्वारे या समस्येवर उपाय शोधला जातो. या फेशियलद्वारे त्वचेतील तैलग्रंथींच्या सक्रियतेला अटकाव घातला जातो.

✽ **फेसलिफ्टींग फेशियल–** अनियमित जीवनशैलीमुळे त्वचेवर अकालीच वय वाढल्याच्या खुणा दिसू लागतात. त्या कमी करण्यासाठी फेसलिफ्टींग फेशियलची मदत घेतली जाते. हे फेशियल दोघांसाठीही उपयुक्त आहे.

✽ **पिगमेंट फेशियल–** सूर्यप्रकाशात जास्त काळ राहिल्याने त्वचा काळवंडते. अशा वेळी त्वचा उजळवण्यासाठी या फेशियलची मदत घेतली जाते. या फेशियलमुळे त्वचेचा डलनेस जातो आणि रक्ताभिसरणही वाढतं.

✽ **स्कीन नरिशिंग फेशियल–** कोरड्या आणि निस्तेज त्वचेसाठी हे फेशियल अत्यंत उपयुक्त आहे. यामुळे त्वचेला पुरेसं पोषण मिळतं.

## बनवा बीटाचा हलवा

रुचिरा

सणांची रेलचेल सुरू झाली की गोडाधोडाचं खायला निमित्त लागत नाही. पण नेहमीचे पदार्थ खाण्यापेक्षा काही तरी वेगळं करायला काय हरकत आहे? त्यातही बीट नुसतं खायला अनेकजण नाक मुरडतात. त्याऐवजी हलवा दिसतोही छान आणि पटकन संपतोही! त्यामुळे ही रेसिपी जरूर ट्राय करा.

**साहित्य–** दोन बीट, दोन ते तीन टेबलस्पून तूप, अर्धा वाटी साखर, दहा ते बारा काजू, बारीक काप केलेले बदाम, कपभर दूध, एक टेबलस्पून बेदाणे, पाच ते सहा वेलदोड्यांची पूड


**कृती–** बीट धुवून सालं काढून घ्यावीत. त्यानंतर बारीक खिसून घ्यावं. कढई गरम करून थोडंसं तूप टाकावं. त्यात काजू आणि बदामाचे काप टाकावेत. हलक्या रंगावर परतून घ्यावं. एका प्लेटमध्ये काढून बाजूला ठेवावं. कढईत दोन टेबलस्पून तूप टाकावं. यात बीटाचा खिस टाकावा आणि मंद आचेवर दोन ते तीन मिनिटं परतून घ्यावा. त्यावर वेलदोड्याची पूड भुरभुरावी. बीटाचा खिस मऊ होऊ लागल्यावर साखर मिसळावी. त्यानंतर बेदाणे टाकावेत. हे सर्व करत असताना बीटाचा हलवा हलवत रहावा. त्यानंतर बदाम आणि काजूचे काप टाकावेत. थोडे काप सजावटीसाठी बाजूला ठेवून द्यावेत. हलवा तयार झाला की सजावटीसाठी ठेवलेले काप पसरवावेत आणि सर्व्ह करावा. फ्रीजमध्ये ठेवल्यास हा हलवा पाच ते सहा दिवस चांगला राहतो.



## तिला विश्वासात घ्या!

समुपदेशन

मी वीस वर्षीय मुलीची माता असून तिच्या एका निर्णयामुळे सध्या कमालीचा ताण अनुभवत आहे. माझी मुलगी या वयात एका मुलीला दत्तक घेण्याचा विचार करत असून हा निर्णय घेण्यात तिला आमची मदत हवी आहे. मात्र आमचा निर्णय दुजोरा देणाराच असावा, अशी तिची अपेक्षा आहे. तिला लग्न करुन संसार थाटण्याचीही हौस आहे. पण त्याआधी एकेरी पालकत्व निभावण्याच्या इच्छेने तिला झपाटलं आहे. अद्याप तिचं शिक्षण पूर्ण व्हायचं आहे. तिला पायावर उभं करणं हे आमच्यापुढील ध्येय आहे. पण असं असताना हे खूळ घेऊन ती करत असलेली मागणी मान्य कशी करावी हा माझ्यापुढील प्रश्न आहे. ती नकार पचवण्याच्या मानसिकतेत नसल्यामुळे कसं समजवावं हा यक्षप्रश्न आहे. काय करावं ते समजत नाही.



– आयुष्यात अशी अनेक अवघड वळणं येतात जी खरोखरच कसोटी पाहतात. सध्या तुम्ही याच वळणावर आहात. एखाद्या व्यक्तीचा आदर्श समोर ठेवून या अल्लड वयात काही स्वप्नं पाहिली जातात. मात्र ती प्रत्यक्षात आणणं सोपं नाही हे तेव्हा कळत नसतं. ही अनुकरणप्रियता असते, हट्ट असतो, स्वप्नील मनोवस्था असते. त्याला वास्तवाची बूज नसते. म्हणूनच प्रथम तिला विश्वासात घ्या. आपला हा निर्णय संपूर्ण आयुष्यावर प्रभाव टाकणारा आहे या वस्तुस्थितीची जाणीव तिला करून द्या. तिच्या या निर्णयामुळे भविष्यात विवाह ठरण्यात अनेक अडचणी येऊ शकतील हे वास्तव तिच्यापर्यंत पोहोचवा. मुख्य म्हणजे मूल दत्तक घेण्याची प्रक्रिया किचकट असून इतक्या लहान वयात मूल दत्तक घेणं अवघड असल्याचंही तिला समजून सांगा. ती विवाहापश्चात, आर्थिक निर्भरतेनंतर हा निर्णय घेऊ शकते हे समजावल्यास ती तुमचं म्हणणं ऐकू शकेल.

## असं जपा पेंटिंग

जरा हटके...

घराला वेगळा लूक देण्यासाठी पेंटिंगची निवड केली जाते. वेगळ्या लूकमध्ये, रंगामध्ये असलेली पेंटिंग्ज घरातील भिंतीवर उठून दिसतात. घरासाठी अनेकदा महागडी पेंटिंग्ज खरेदी केली जातात. पण या पेंटिंग्जची काळजी कशी घ्यावी हे माहीत नसल्याने खराब होण्याची शक्यता असते. महागडी पेंटिंग्ज केवळ काळजी न घेतल्याने खराब होऊ नयेत म्हणून पुढील टिप्स वापरा.

✽ पेंटिंग केवळ वरच्या बाजूने पकडू नये; तर दोन्ही हातानी सपोर्ट द्यावा.

✽ अनेकदा पेंटिंग स्वच्छ करण्यासाठी ब्रशचा वापर केला जातो. पण यामुळे पेंटिंगवर ओरखडे पडण्याची शक्यता असते. अशा वेळी पेंटिंग स्वच्छ करण्यासाठी वेलवेटच्या कापडाचा वापर करणं गरजेचं आहे.

✽ पेंटिंग कुठे लावलं जातं हे देखील महत्त्वाचं आहे. शक्यतो पेंटिंग घराच्या बाहेरच्या भिंतीवर लावू नये, कारण त्यावर मॉईश्चर जमा होऊन खराब होण्याची शक्यता असते.

✽ पेंटिंग घराच्या सर्वात वरच्या मजल्यावर ठेवणं टाळावं. यामुळे उष्णतेचा थेट प्रभाव पेंटिंगच्या कॅन्व्हासवर पडून खराब होण्याची शक्यता असते.

✽ पेंटिंग काढून ठेवायचं असल्यास प्लॅस्टीक शीटमध्ये गुंडाळून ठेवू नये.

✽ पावसाळ्यात पेंटिंगला फंगस लागण्याचा संभव असतो. अशा वेळी स्वत: स्वच्छ करण्याचा प्रयत्न करू नका.

✽ पेंटिंगच्या कॅनव्हासला उघड्या हाताने स्पर्श करणं टाळावं. त्वचेवर थोड्या प्रमाणात तेल असतं. त्यामुळे पेंटिंग खराब होण्याची शक्यता असते.



### घरगुती उपाय

#### असा साठवा पुदिना

पावसाळ्यात पालेभाज्या, फळभाज्या साठवणे कठीण असते. भाज्या लवकर खराब होण्याचा धोका असतो. असे असले तरी आज आपण पुदिन्याची पाने साठवून ठेवण्याचा सोपा उपाय बघू या. त्यासाठी पुदिन्याची पाने काढून बर्फाच्या ट्रे मध्ये ठेवा. आता त्यात पाणी भरा ते फ्रीजरमध्ये गोठवा. नंतर आवश्यकतेनुसार रेसिपीमध्ये पुदिन्याच्या पानांसह गोठलेले बर्फाचे तुकडे घाला. तुम्हाला हवा तसा पुदिन्याचा स्वाद आणि रंग आलेला दिसेल.



### हेअर केअर



#### केस चिपचिपे होतात?

पाऊस स्थिरावला की केसांच्या समस्या डोके वर काढू लागतात. वारंवार भिजल्यामुळे वा दमटपणामुळे केस चिपचिपे होतात. केसांचा चिकटपणा अगदी नकोसा वाटतो. मात्र हा त्रास टाळायचा असेल तर केसांना वारंवार हात लावण्याची सवय टाळा. केसांसाठी नेहमी स्वच्छ कंगवा वापरा आणि तो आठवड्यातून एकदा तरी धुण्याची सवय ठेवा. पावसाळ्यात आठवड्यातून किमान तीन वेळा केस धुवा आणि ओलावा नसणारा शॅम्पू वापरा. यामुळेही केस लवकर तेलकट होणार नाहीत.

### फॅशन–पॅशन

#### आकर्षक मिरर रिंग

अंगठीच्या विविध आणि नाविन्यपूर्ण प्रकारामध्ये सध्या मिरर वर्क रिंग महिलांना आकर्षित करुन घेत आहे. आपल्याकडील वस्त्रसंस्कृतीमध्ये फार पूर्वीपासून कपड्यांपासून दागिन्यांमध्येही आरशाला बरेच पसंती दिल्याचे दिसते. असे असताना आता मिरर वर्क रिंगदेखील आभुषणांमध्ये मानाचे स्थान मिळवताना दिसत आहे. या प्रकारची खास अंगठी तुम्ही लेहेंगा, साडी किंवा वेस्टर्न आउटफिट अशा कशासोबतही कॅरी करु शकता. यामध्ये अनेक युनिक आणि स्टायलिश डिझाईन्स बघायला मिळतील.



## विकत नको, दत्तक घ्या!

पेट केअर

आजकाल प्राणी पाळणं ही नवलाईची बाब राहिलेली नाही. पण पाळीव प्राणी विकत घेण्यापेक्षा दत्तक घेण्याचा ट्रेंड दिसून येत आहे. यामध्ये महागड्या पेट्सपासून रस्त्यावरील श्वानापर्यंत दत्तक घेतले जात आहेत. प्राणी दत्तक घेतल्यानंतर त्याची विशेष काळजी घेण्याची गरज असते. प्राणीमित्र संस्थाही प्राणी दत्तक घेण्याच्या प्रक्रियेला पाठिंबा देताना दिसतात. प्राणी दत्तक घेतल्यानंतर कशी काळजी घ्यावी, यासाठी...

✽ प्राणी दत्तक घेतल्यानंतर सगळ्यात महत्त्वाचं असतं ते हेल्थ चेक अप. दत्तक घेतलेल्या प्राण्याची हेल्थ हिस्ट्री जाणून घेऊन त्याप्रमाणे लसीकरण करणं गरजेचं असतं. याशिवाय प्राण्याला एखाद्या पेट ग्रुमिंग सेंटरमध्ये न्यावं. त्यामुळे घरी आल्यावर त्याला अनोळखी वातावरणाचा त्रास होणार नाही.



✽ घरी आणल्यानंतर प्राण्याचा रोजच्या रोज व्यायाम होतोय ना, याची काळजी घ्या. अनेक प्राणी नवीन घरी गेल्यानंतर लठ्ठ होऊ लागतात. त्यामुळे या नव्या पाहुण्याचा रोजच्या रोज व्यायाम होतोय ना, याकडे लक्ष द्या.

✽ प्राणी दत्तक घेतल्यानंतर मालकाशी बॉंडिंग होणं गरजेचं असतं. त्यासाठी प्राण्याला पुरेसा वेळ देता येईल याची काळजी घ्या. यामध्ये प्राण्याला भरवणं, फिरायला नेणं, प्रेमाने बोलणं या बाबी महत्त्वाच्या ठरतात.

✽ नवीन घरात आल्यावर स्थिरावण्यासाठी प्राण्याला स्वत:चा वेळ घेऊ द्या. त्याला मर्यादित प्रमाणात गोंजारा. यामुळे प्राणी नव्या वातावरणाशी लवकर जुळवून घ्यायला शिकतो.

✽ नवीन प्राणी घरी आला की त्याचे अतीलाड केले जातात. यामुळे प्राणी लाडावून बसण्याची शक्यता जास्त असते. अशा वेळी प्राण्यांना शिकवण्यासाठी थोड्या–फार शिस्तीचा अवलंब करणं गरजेचं असतं.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✽ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11